सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. २६ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५४ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अमित शाहांची सभा ठरणार भाजपाची मोठी खेळी

नांदेड : नांदेडमध्ये राजकीय वातावरण तापलंय. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची जाहीर सभा नांदेडमध्ये होतेय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीतल्या अनेक नेत्यांच्या आक्रमक रणनीतीमुळे भाजपाचा शंखनाद होताना दिसतोय. या पार्श्वभूमीवर भाजपाची रणनीती आणि मराठवाड्यातील राजकीय डावपेच काय असतील ? चला, घेऊ सविस्तर आढावा.

नांदेड हे मराठवाड्याचं राजकीय केंद्र. राज्यातल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, देगलूर, भोकर, मुखेड आणि नायगाव या सहाही जागांवर विजय मिळवला. यात भाजपाने चार, तर शिवसेनेने दोन जागा जिंकल्या. मात्र लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे रवींद्र चव्हाण यांनी भाजपाच्या संतुक हंबर्डे यांचा १४५७ मतांनी पराभव केला. त्यामुळे नांदेडमधील मतदारांचा 'स्प्लिट व्होटिंग'चा ट्रेंड समोर आला. मतदारांनी विधानसभेत महायुतीला आणि

लोकसभेत काँग्रेसला पसंती दिली.

याच नांदेडमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा शंखनाद होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमित शाह यांची ही सभा म्हणजे भाजपाचं शक्तिप्रदर्शन असणार आहे. महायुतीने २०२४च्या विधानसभा निवडणुकीत २३० जागांसह प्रचंड विजय मिळवला होता. आता स्थानिक निवडणुकीतही विजयाची ही परंपरा कायम ठेवण्याचा मोदी सरकारचा मानस आहे.यासाठी अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी नांदेड प्रतिष्ठेचं केलंय.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढण्याचा महायुतीचा विचार आहे. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आधीच घोषित केलीय. मराठवाड्यातील मागासवर्गीय आणि ग्रामीण मतदारांना एकत्र आणणं हाही त्यामागचा एक उद्देश आहे. नांदेडमध्ये विशेषतः ओबीसी आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा आहे आणि सुप्रीम कोर्टाच्या ताज्या निर्णयानंतर ओबीसी आरक्षण पुन्हा लागू होणार असल्याने महायुतीला याचा फायदा होऊ शकतो.

भाजपाची रणनीती ही स्थानिक नेत्यांना संधी देत ग्रामीण भागात आपली पकड मजबूत करण्याची आहे. मराठवाड्यातील दुष्काळ, शेती आणि पायाभूत सुविधांचे प्रश्न यावर महायुती आक्रमकपणे बोलत आहे. अमित शहा यांच्या सभेतून विकास आणि स्थैर्य या मुद्द्यांवर भर दिला जाण्याची शक्यता आहे. याशिवाय, महायुतीने एकनाथ शिंदे यांना प्रशासकीय कामात अधिक सामावून घेत त्यांची नाराजी दूर करण्याचाही प्रयत्न केलाय. त्यामुळे नांदेडसारख्या भागात शिवसेनेचे स्थानिक नेते पुढाकार घेऊ शकतात.

महायुतीने मराठवाड्यातील स्थानिक निवडणुकीत यश मिळवायचा चंग बांधलाय. त्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षांना बरोबर घेऊनच पुढे जावं लागेल. नांदेडमध्ये भाजपा आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांचा मोठा प्रभाव आहे. नांदेडमधील सभा ही एक प्रकारे महायुतीच्या एकजुटीचं प्रदर्शन ठरणार आहे. यात मतदारांचा मूड पाहूनच महायुतीला रणनीती ठरवावी लागणार आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा प्रचार, लाडकी बहीण योजनेचा वापर योग्य प्रकारे करावा लागणार आहे. भाजपाला प्रत्येक मतदारसंघात रणनीती आखावी लागेल.

नांदेडमधील अमित शाह यांची सभा ही केवळ निवडणूक प्रचारापुरती मर्यादित नाही, तर ती महायुतीच्या एकजुटीचं आणि मराठवाड्यातील वर्चस्वाचं प्रदर्शन आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभेत दमदार कामगिरी केली, मात्र स्थानिक निवडणुकीत यश मिळवण्यासाठी त्यांना काँग्रेसच्या आव्हानाला तोंड द्यावं लागेल.

दुसरीकडे काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केलेल्या अशोक चव्हाण यांचा नांदेड आणि मराठवाड्यातील प्रभाव लक्षात घेता त्यांचा महायुतीला काय फायदा होतो हेही पाहणं महत्त्वाचं आहे. जिल्हा परिषद, सोळा पंचायत समित्या, पंधरा नगर परिषदा, एक महापालिका आणि चार विधानसभा मतदारसंघांवर अशोक चव्हाण यांच्या समर्थकांचं वर्चस्व आहे.

'मन की बात'मध्ये काय म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी मन की बात कार्यक्रमाच्या १२२ व्या भागात ऑपरेशन सिंदूरवर बोलले. देश दहशतवादाच्या विरोधात एकवटलेला दिसत आहे. प्रत्येकाचे मत आहे की, दहशतवादाचा बीमोड व्हावा. भारतीय सैन्याने सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे तळ नष्ट केले. ऑपरेशन सिंदूर हे बदलत्या भारताचे दर्शन घडवते. प्रत्येकातील देशभक्ती दिसत आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहीम नव्हती. तर ते आमच्या दृढनिश्चयाचे, धैर्याचे आणि बदलत्या भारताचे चित्र आहे; असेही ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूर आता अनेक भारतीयांचा जीवनाचा भाग बनले आहे. बिहारमधील कटीहार, उत्तर प्रदेशमधील कुशीनगर आणि इतर अनेक ठिकाणी जन्मलेल्या बाळांना सिंदूर हे नाव देण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींनी सैनिकांच्या धाडसाचे आणि कौशल्याचे तसेच स्वदेशी तंत्रज्ञानाच्या वापराचे कौतुक केले. भारतीय सैन्याने पाकिस्तानमध्ये जाऊन दहशतवाद्यांचे तळ नष्ट केले. यातून सैनिकांचे अतुलनीय शौर्य दिसून आले. यासाठी सैन्याने भारतीय शस्त्रे आणि स्वदेशी तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात वापरल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूरनंतर आता व्होकल फॉर लोकल ही संकल्पना अनेकांना प्रेरीत करत असल्याचेही पंतप्रधान म्हणाले. भारतीय बनावटीच्या वस्तू खरेदी करणे, भारतीय सेवांचा लाभ घेणे याचे प्रमाण वाढत आहे. सुटीत फिरण्यासाठी भारतातील पर्यटनस्थळांवर जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अनेक तरुण आता भारतातच डेस्टिनेशन वेडिंग करण्यास उत्सुक आहेत; असेही पंतप्रधान म्हणाले.

नक्षलवाद संपुष्टात येत आहे. नक्षलवाद्यांमुळे ज्या जिल्ह्यांमध्ये पायाभूत सुविधांचाही अभाव होता आता तिकडे परिस्थिती बदलत असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्याच्या काटेझारी गावात पहिल्यांदाच बस पोहोचली. गावातील लोकांनी ढोल वाजवून बसचे स्वागत केले. विकास होत आहे. उत्तराखंडमधील हल्द्वानी येथील ६५ वर्षीय जीवन जोशी यांच्याबद्दलही पंतप्रधान मोदी यांनी माहिती दिली. ते म्हणाले, पोलिओमुळे जीवन जोशी यांचे पाय अधू झाले पण त्यांचे धैर्य खचले नाही. जोशी यांनी पाईन झाडापासून बॅगेट नावाची कलाकृती तयार केली. या कलाकृतीमुळे या भागाची नवी ओळख निर्माण झाली आहे; असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान मोदींनी 'मन की बात'मधून केले मनमाडच्या खेळाडूंचे कौतुक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२२ व्या 'मन की बात' कार्यक्रमामधून देशवासियांशी संवाद साधला. यावेळी ते खेलो इंडिया या उपक्रमाबाबत बोलले. मनमाडमध्ये राहणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळणाऱ्या साईराज राजेश परदेशी या खेळाडूचे त्यांनी कौतुक केले. परदेशीने बिहार येथे काही दिवसांपूर्वी झालेल्या खेलो इंडिया खछ यूथ गेम्समध्ये तीन नवे राष्ट्रीय विक्रम केले आहेत.

बिहारच्या पाच शहरांमध्ये खेलो इंडिया खछ यूथ गेम्सच्या वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. देशातील पाच हजारांपेक्षा जास्त खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. खेळाडूंनी बिहारच्या खिलाडू वृत्तीचे आणि बिहारच्या आत्मीयतेचे कौतुक केले. यंदा खेलो इंडियामध्ये २६ विक्रम झाले. भारोत्तोलन स्पर्धेत महाराष्ट्राची अस्मिता

बेमोसमी पावसाची पुन्हा सलामी, आंतरमशागतीची कामे खोळंबली!

छत्रपती संभाजीनगर : शनिवारी, २३ मे रोजी बेमोसमी (वळवाच्या) पावसाने दिवसभर विश्रांती घेतल्यानंतर रविवारी, २५ रोजी सकाळीचे सलामी दिली. शहर आणि जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी दुपारी बारा वाजेपर्यंत अधून-मधून हलक्या व मध्यम प्रकारच्या सरी कोसळल्याने वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. दरम्यान, सर्वत्र जमिनीत चांगल्या प्रकारे ओल निर्माण झाली असली तरी आंतरमशागतीची कामे खोळंबल्याने शेतकरी चिंतेत आहेत. शहर परिसरात सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ४.० मि. मी पावसाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने केली आहे.

सध्या जर आपण महाराष्ट्रातील परिस्थिती बघितली तर शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाल्याची स्थिती आहे. शेतकऱ्यांकडून खरीप हंगामासाठी रान तयार करावयाचे आहे. नांगरट, वखरणी अशी कामे खोळंबली आहेत. बेमोसमी पावसामुळे खोलवर ओल झाली असली तरी खरीप पेरणी करणे घातक असल्याचे कृषी शास्त्रज्ञ सांगत असल्यामुळे शेतकरी कापूस लागवडीचे जोखीम स्वीकारायला धजत नाहीत. दोन दिवसात मान्सूनचे आगमन होण्याचा अंदाज आहे. मात्र, मान्सून हुलकावणी देण्याचा अंदाजही हवामानतज्ज्ञांनी वर्तविला आहे. पेरणीची घाई करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख तसेच जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकाऱ्यांनी केले आहे. अशा परिस्थितीत पेरणी केल्यास आणि पावसाने उघडीप दिल्यास मरतुक होण्याचा इशारा कृषी शास्त्रज्ञांनी दिला आहे.

रविवारी सकाळपासूनच मान्सूनपूर्व पावसाची रिपरिप सुरू झाली. शहरासह जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी अधून-मधून हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या सरी कोसळल्या. भूगर्भातील पाणीपातळीतही थोडीफार वाढ झाली असल्याचा दावा जलसंपदा विभागाने केला आहे. दुपारपर्यंत अधून-मधून पावसाच्या सरी कोसळत होत्या.

युद्धबंदीनंतरही सीमेवर भारतीय सैनिक शहीद का होत आहेत ?

विजयी मिरवणुका काढणाऱ्यांनी उत्तर द्यावे : माकप

छत्रपती संभाजीनगर - व्यापारबंदीची धमकी दल्यिानंतर भारत व पाकस्तिान यांनी युद्धबंदी जाहीर केल्याचे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले होते. डोनाल्ड ट्रम्प यांना असे जाहीर करण्याचा खरेतर कोणताही अधिकार नाही. काश्मीर व संबंधित बाबी या भारत व पाकस्तिान यांचा अंतर्गत प्रश्न आहे. अशा प्रकारची भूमिका सातत्याने आजपर्यंत भारताने घेतलेली होती. मात्र, मोदी सरकारच्या राजवटीत कदाचित या स्वाभिमानी व भारताच्या हिताच्या भूमिकेला तिलांजली देण्यात आली असल्यामुळे असे झाले आहे.

ट्रम्प यांनी जाहीर केल्याप्रमाणे खरोखरच युद्धबंदी झाली असेल तर मग सीमेपलीकडून होणारा गोळीबार तसेच सीमेच्या आतमध्येही सुरू असणारा गोळीबार थांबायला पाहिजे होता. मात्र, तसे झालेले नाही. अहल्यानगर जल्ह्याच्या अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथील सुपुत्र शहीद संदीप गायकर यास चकमकीमध्ये आपले प्राण गमवावे लागले आहेत. युद्धबंदी असतानाही या आमच्या लेकराला प्राण का गमवावे लागले ? विजयी मिरवणुका काढणारे हा प्रश्न ट्रम्प आणि पाकस्तिानला विचारणार आहेत का? देशवासीयांपासून काही लपविले जाते आहे का, असा ठोस प्रश्न मार्क्सवादी कम्युनस्टि पक्ष राज्यकर्त्यांना व भारतीय जनता पक्षाला विचारत आहे.

लपवणूक कशासाठी ?

शहीद संदीप गायकर यांच्या शहीद होण्याची बातमी त्यांच्या ब्राह्मणवाडा गावात व अकोले तालुक्यात येऊन धडकली असताना सुद्धा तेथील भाजप व संबंधित नेत्यांनी मोदींना विजयाचे श्रेय देणारी यात्रा काढली. राज्यभर व देशभर अशा विजयी यात्रा काढल्या जात आहेत. एकीकडे विजय यात्रा काढायच्या, युद्धबंदीचे सुद्धा राजकारण करायचे, श्रेय घ्यायचे व दुसऱ्या बाजूला शेतकरी, कष्टकरी, श्रमिक जनतेची लेकरे सीमेवर शहीद होत असताना युद्धबंदी असल्याचे सांगायचे ही अनेक प्रश्नांना जन्म देणारी बाब आहे. भारतीयांपासून काही लपविले जात आहे का, असा प्रश्न यामुळे उपस्थित होतो आहे.

संसदेत स्वतंत्र सत्र घ्यावे

युद्धबंदीबाबत व ऑपरेशन सिंदूरबाबत संसदेत सवस्तिर चर्चा करावी व त्यासाठी स्वतंत्र सत्र घ्यावे, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनस्टि पक्षाने केली होती. इंडिया गटातील इतर अनेक पक्षांनीही अशाच प्रकारची मागणी केली आहे. मात्र याबाबत चर्चा टाळली जात आहे. केंद्रातील भाजप सरकारने याबाबत खुलासा करण्याची आवश्यकता आहे. युद्धबंदी असतानाही गोळीबारात भारतीय सैनिकांचे प्राण का जात आहेत याचे उत्तर त्यांनी देशाला दिले पाहिजे, असे भारताचा कम्युनस्टि पक्षाचे (मार्क्सवादी) राज्य सचिव डॉ. अजित नवले म्हटले आहे.

बिडकीन बसस्थानकमध्ये दारुच्या नशेत लाकडी दांड्याने जबर मारहाण करुन एकाचा खून

आरोपी पोलिसांच्या ताब्यात

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २५ में : पैठण तालुक्यातील बिडकीन बसस्थानक मध्ये दि.२२ मे गुरुवार रोजी सायंकाळी साडे सात वाजे दरम्यान दोन युवकांची एकमेकांना दारू पाजण्याचा कारणावरून शाब्दिक शिवीगाळ व भांडणे झाली याचा राग मनात धरून आरोपी अमोल सोनाजी धर्मे वय २२ रा कल्याण नगर बिडकीन ता पैठण याने मयत मच्छिंद्र जालिंदर तोगे वय ३५ रा.खोडेगाव तालुका जिल्हा छत्रपती संभाजी नगर याला लाकडी दांड्याने जबर मारहाण करुन गंभीर जखमी केले असता त्याला बस स्थानक परिसरातील नागरिकांनी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे दाखल केले असता डॉक्टरने प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर शासकिय रुग्णालयात येथे दाखल करण्यात आले. मच्छिंद्र तोगे याचा उपचारा दरम्यान दि.२४ शनिवार रोजी रात्री मृत्यू

आरोपी

मयत

झाला. मयताचे वडील फिर्यादी जालिंदर रंगनाथ तोगे वय ५५ यांच्या फिर्यादीवरुन बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस दिनांक २२ गुरुवार रोजी अटक करण्यात आलेली आहे.

दिनांक २५ रविवार रोजी घटनास्थळी ठसेतज्ञ व बिडकीन पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे, संजय चव्हाण, यांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे, संजय चव्हाण पुढील तपास करीत आहे.

पाच विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक, निवडणूक आयोगाची घोषणा

नवी दिल्ली : पाच विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रक काढून ही घोषणा केली आहे. गुजरातमधील दोन तर केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी एका विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे.

गुजरातमध्ये करसनभाई पंजाभाई सोलंकी यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या कडी (एससी) तसेच भायनी भूपेंद्रभाई गंधूभाई यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विसावदर येथे पोटनिवडणूक होणार आहे. केरळमध्ये पीव्ही अन्वर यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या निलांबूरमध्ये पोटनिवडणूक होणार आहे. गुरप्रीत गोगी बस्सी यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पंजाबच्या लुधियाना पश्चिम येथे पोटनिवडणूक होणार आहे.



CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

कळंब बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी लंपास

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२५ मे -

कळंब बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची साखळी चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, सखुबाई नवनाथ सांगळे (वय ५५, रा. धनेश्वरी बोरगाव, ता. कळंब) या दिनांक २३ मे २०२५ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कळंब बसस्थानकातून कळंब ते पारा जाणाऱ्या एस.टी. बसमध्ये चढत असताना, अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील अंदाजे १ तोळे वजनाची सोन्याची साखळी चोरून नेली.

या घटनेची तक्रार सखुबाई सांगळे यांनी २४ मे २०२५ रोजी कळंब पोलीस ठाण्यात दिली असून, त्यांच्या तक्रारीवरून भादंवि कलम ३०३ (२) अंतर्गत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळंब पोलीस अधिक तपास करत आहेत.

संक्षिप्त वृत्त...

ऑपरेशन सिंदूरच्या विजयाच्या घोषणांनी लोहारा दणाणले

लोहारा, दि.२५ मे -

भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान च्या मुसक्या आवळून ऑपरेशन सिंदुर च्या माध्यमातून अतिशय चालाखीने यशस्वी करून दाखवले. या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ पायी तिरंगा यात्रा दि.२५ मे ेजी सकाळी ११ वा. लोहारा शहरातील भारतमाता मंदिरापासुन सुरुवात करण्यात आली. हि तिरगा यात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, आझाद चौक (जगदंबा मंदिर) मार्गे तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. या यात्रेला शहरासह तालुक्यातील देशभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यात्रेत देशभक्तांनी भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणा दिल्या. तसेच यावेळी तहसीलकार्याजवळ माजी सैनिकांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शहरासह तालुक्यातील माजी सैनिक, राष्ट्रप्रेमी नागरीक, युवक, शहर व तालुक्यातील सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

वाशी येथे पांडुरंग पालखी सोहळ्याचे आगमन

वाशी, दि.२५ मे -

वाशी (जि. धाराशिव) येथे श्री संत मुक्ताबाई अंतरधान समाधी सोहळयासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर पंढरपूरचे

श्री क्षेत्र मुक्ताबाई नगर अनंतकोट ब्रह्मांड श्री पांडुरंग राय पालखी सोहळा सन २०२५ हा मंगळवार २० मे ते सोमवार २६ मे अखेर असून त्यानुसार वाशी येथे २६ मे रोजी सकाळी नऊ वाजता श्री तांबडा मारुती मंदिर येथे विश्रांती घेणार आहे. सदरील पालखी सकाळी आठ वाजता कुंथलगिरी फाट्यावरून वाशी येथे येणार असून वाशीत आल्यानंतर शिवाजी चौकातून भक्तीमय वातावरणात पालखीची भव्य मिरवणूक निघणार आहे.वाशी येथील सर्व भाविक भक्तांनी पालखी मिरवणुकीमध्ये सहभाग घ्यावा असे वाशी येथील भाविक भक्त दादासाहेब चेडे यांनी कळविले आहे.

शकुंतला गंगाधर शिंगाडे यांचे निधन

धाराशिव, दि.२५ मे -

येथील भीमनगर येथील रहिवासी श्रीमती शकुंतला गंगाधर शिंगाडे (वय ८५) यांचे आजारणामुळे रविवारी

सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी १ वाजता बौद्ध स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात सहा मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे, परतुंडे असा मोठा परिवार आहे. बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे सदस्य विशाल शिंगाडे यांच्या त्या मातोश्री होत.

धाराशिव आरटीओचे सोंग; पवनचक्कीचे साहित्य वाहतूक करणारी वाहनं जोमात

- ओव्हरलोड वाहतुकीने रस्ते खराब...
- आरटीओ पवनचक्कीच्या वाहनांवर मेहेरबान?...
- जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची लोकांची मागणी...

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२५ मे -

पवनचक्की उभारण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची वाहतूक करणाऱ्या लांबलचक वाहनामुळे नागरिकांना तसेच वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्ते देखील खराब होत आहेत. या प्रकाराकडे धाराशिव प्रादेशिक परिवहन (आरटीओ) विभागाचे दुर्लक्ष आहे, की डोळ्यावर काळा गॉगल घातल्यामुळे त्यांना ही वाहने दिसत नाहीत. असा सवाल त्रस्त वाहन चालक विचारात आहेत. आरटीओ निवांत असल्यामुळे पवनचक्कीची वाहने नाद करा पण आमचा कुठं अशी गाणी वाहनात लावून महामार्गावर धमाल उडवत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होत असून आरटीओ साहेबांना इतर ट्रक व त्यातील लोड दिसतो पण पवनचक्कीच्या रस्त्यावरून जात असलेल्या लांबलचक गाड्या व त्यातील ओव्हरलोड दिसत नाही का? की पवनचक्कीच्या वाहनांकडून काय देवाण-घेवाण झाली आहे,का? अशी चर्चा आहे. सध्या वाशी तालुक्यातील अनेक गावांमध्ये पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या विविध कंपन्याकडून पवनचक्क्या उभारणीची कामे सुरू आहेत. पवनचक्क्या उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी भाडेपट्ट्यावर खरेदी केले आहेत. त्या ठिकाणी पवनचक्कीचे साहित्य नेण्यासाठी भल्या मोठ्या लांबलचक वाहनांतून ओव्हरलोड साहित्य वाहिले जात आहे. एका मागे एक पवनचक्कीची वाहन चालत असल्याने रस्त्यावर जणू काय रेल्वेच आली आहे, असे चित्र पाहायला मिळते. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची कोंडी होत असून इतर वाहनांना त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी चालकांना देखील वाहन चालवताना कसरत करावी लागत आहे. ही वाहने रात्रीच्या वेळी अंधारात तर मोठा धुमाकूळ घालत आहेत. धाराशिव प्रादेशिक परिवहन विभाग आरटीओ ची गाडी सोलापूर संभाजीनगर हायवेवर रोज गस्त घालत असते, आरटीओ कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, हरियाणा सह इतर राज्यातील ट्रक चालकांना लायसन दावा, परमिट दावा, सीट बेल्ट लावलाय का, वाहनात किती लोड आहे. म्हणत त्रास दिला जात आहे. सर्व कागद व्यवस्थित असताना सुद्धा चालकाकडून हप्ते घेतले जातात. परंतु पवनचक्कीच्या वाहनांना असं कुठे अडवलं जात नाही किंवा त्यांच्या वाहनांची विचारपूस केली जात नाही. धाराशिव प्रादेशिक परिवहन विभाग पवनचक्कीच्या वाहनांवर का मेहेरबान आहेत?

महामार्गावरून ग्रामीण भागात ही अवजड व लांब पल्ल्याचे वाहने कधी रात्रीच्या अंधारात तर कधी ऐन वाहतूक आसलेल्या दिवसाच्या वेळेत वळत असल्याने एक ते दोन तास महामार्ग वाहतूक ठप्प होत असते. ही वाहने रात्रीच्या वेळेत वळताना तर खूप धोकादायक ठरत आहेत. अचानक मोकळ्या रस्त्यावरून वेगात आलेले वाहने अचानक ही आडवी वाहने दिसल्याने अपघातग्रस्त झाली आहेत. परंतु या सर्व गोष्टी झाकून टाकण्यात येत आहेतं. तालुक्यात पवनचक्की कारभार हा दाद ना फिर्याद असा चालू आहे. पोलीस तक्रार न घेता मध्यस्थी आणि पवनचक्की ला संरक्षण देऊन करतात. गावागावांतील तिथल्या ग्रामपंचायत, नगरपंचायत चे म्होरके पैसे घेऊन ना हरकत वाटतं आहेत. त्यात पुन्हा दलालीची भर असल्याने जनतेला नाहक त्रास होत आहे.

पवनचक्कीच्या वाहनामध्ये अमर्यादित लोड असतो, ती वाहने हायवे सोडून गावपातळीवरील रस्त्यावर आल्यानंतर वळताना एक तास ते दोन तास रस्ते जाम होत आहेत. या अवजड वाहनांमुळे ग्रामीण भागातील रस्ते देखील खराब होत आहेत. तसेच वाहनांना आडव्या आलेल्या झाडांची कत्तल करत निसर्गाचा ऱ्हास केला जात आहे.

मात्र त्याच्या तक्रारीकडे लक्ष दिले जात नसल्याने आता जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहेत.

नंदगाव येथील ३३/११ के.व्ही.ए. सबस्टेशनचे खा. आमे राजेनिंबाळकर यांच्या हस्ते भूमिपुजन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ मे -

नंदगाव (ता. तुळजापूर) येथे नवीन ३३/११ के.व्ही.ए क्षमतेचे वीज उपकेंद्राच्या भूमिपूजन खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते पार पडला.एम.एस.के.व्ही.वाय ०.२ या योजनेतून २ ते २.५० कोटी रुपये खर्च करुन २ एकर जागेवरती सदर उपकेंद्र येणाऱ्या १८ महिन्याम ध्ये पुर्ण होणार असून परीसरातील नागरीकांची प्रलंबीत मागणी या उपकेंद्रामुळे पुर्ण होणार आहे.

या विद्युत उपकेंद्राच्या निर्मीतीम ुळे नंदगावसह सिंदगाव, बोरगाव, बोळेगाव, हंगरगा (नळ), लोहगाव आदी गावासह आजूबाजूच्या परिसरातील शेती, लघुउद्योग व घरगुती वीज वापर अधिक सक्षम, सुरळीत व दर्जेदार होणार आहे.

ग्रामीण भागात आधुनिक पायाभूत सुविधांचा विस्तार करणे हा आमचा संकल्प आहे, आणि हे उपकेंद्र या दिशेने एक मोठे आणि महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. असे खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर उद्घाटनावेळी जाहीर केले.

नवीन सबस्टेशन भविष्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्यास समर्थ ठरणार आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेच्या समस्यांवर कायम चा तोडगा मिळणार असून, या भागातील ग्रामीण भागाचा वीज विकास अधिक भक्कम होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा सुरळीत होणार असून कृषी करीता होणाऱ्या विद्युत पुरवठयात नियमीतता येणार आहे.

यावेळी महावितरणचे अधिकारी तसेच कमलाकर चव्हाण, अशोक भाऊ पाटील, गजेंद्र पाटील, प्रकाश चव्हाण, कृष्णाथ मोरे, सूर्यकांत अरबळे, परमेश्वर चिनगुंडे, गिरीश नवगिरे, राजेंद्र जाधव, सोमनाथ परशेट्टी, बाळू मारेकर, राजू मोर या सर्वांनी या महत्त्वपूर्ण उपस्थिती होती.

विजोरा येथे शेताच्या वादातून हाणामारी; ७ जणांवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२५ मे -

विजोरा शिवारात शेताच्या बटाईच्या कारणावरून झालेल्या वादातून एका कुटुंबावर सात जणांनी एकत्र येऊन मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात संबंधित सात आरोपींविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बबन त्र्यंबक भैरट (वय ६०, रा. विजोरा) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, दि.२३ मे २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास चंद्रहास मारुती भैरट यांच्या घरासमोरील रस्त्यावर फिर्यादी, त्यांची पत्नी व मुलगा

यांना शेत बटाईच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण करण्यात आली. तसेच, जिवे ठार मारण्याची धम कीही आरोपींनी दिली.

या प्रकरणी सचिन हणुमंत खोसे, अमोल हणुमंत खोसे, हणुमंत यशवंत खोसे, तिलुबाई हणुमंत खोसे, उशा सचिन खोसे, पल्लवी अमोल खोसे आणि अश्विनी हणुमंत खोसे (सर्व रा. विजोरा, ता. वाशी, जि. धाराशिव) अशी आरोपींची नावे असून, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवकाळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत भरपाई द्या

राष्ट्रवादीची मागणी...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ मे -

धाराशिव जिल्ह्यात अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकजयांना त्वरीत दुप्पट नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी म ागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी राज्याचे कृषी मंत्री माणिक कोकाटे यांच्याकडे शुक्रवारी (दि.२३) निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात दुधगावकर यांनी म्हंटले आहे की, २२ मे २०२५ पर्यंत धाराशिव जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसाने कहर केला असून जवळपास ३५० हेक्टर क्षेत्रावरील फळबागा, पीके, भाजीपाला याचे १०० टक्के नुकसान झालेले आहे. याचा फटका जिल्ह्यातील शेतकजयांना बसलेला आहे. या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील ४० जनावरांचा बळी गेला असून ५० ते ६० घरांची पडझड झालेली आहे. जिल्ह्यात आठ महसुल सर्कलमध्ये अतिवृष्टी झालेली आहे. या पावसामध्ये दोन व्यक्तींचा वीजेच्या प्रकोपामध्ये बळी गेलेला आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थीक मदत द्यावी व अवकाळी पावसामुळे मृत झालेल्या मानव, गाय, म्हैस, बैल, घोडा, शेळी, मेंढी, वासरे, रेडकू, कोंबडया यांच्या सानुग्रह अनुदानात दुप्पट्टीने वाढ करुन येत्या आठ दिवसात संबंधीत शेतकऱ्यांना आर्थीक मदत देणे संदर्भामध्ये आदेशीत करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ मे -

सहयाद्री स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, धाराशिव येथे गुणवंत विद्यार्थींचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

यावेळी आशा माने, शुभम वाघ, प्रवीण झिंगणे, कृष्णा शिंदे, जमीर सय्यद या गुणवंत विध्यार्थींचा सत्कार आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुभाष चव्हाण, रेखाताई कदम, सुरेश कदम, कुसुम वाघ, प्रा. सिद्धेश्वर मते, प्रा. अजित रणदिवे, प्रा. संदीप पोळ, पवार, प्रा. मयूर रणदिवे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक सानिका कदम हिने तसेच सूत्रसंचालन श्रुती मुळे केले.

सावरगाव येथून १७.५५ लाखांच्या केबल्सची चोरी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ मे -

सावरगाव येथील साईटवरून सुमारे १७ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या तांब्याच्या आणि ॲल्युमिनियम धातूच्या केबल्स अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी किर्ती कुमार देवदास भोजक (वय ५८ वर्षे, रा. ओंकार अपार्टमेंट, जगदाळे कॉलनी, प्रतिभा नगर, कोल्हापूर, हल्ली मुक्काम शालीमार कॉलनी, ललीत मंजील, शिंगोली, ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे सावरगाव येथील साईटवर

अज्ञात चोरट्यांविरुद्ध तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

विविध प्रकारचे स्क्रेअर एम.उम. तांब्याचे व ॲल्युमिनियम धातूचे एकूण १५,२४८ मीटर लांबीचे केबल्स अज्ञात चोरट्याने दि. २० मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते २१ मे रोजी सकाळी ११ वाजेपर्यंतच्या दरम्यान चोरून नेले. चोरून नेण्यात आलेल्या केबल्सची एकूण किंमत सुमारे १७ लाख ५५ हजार रुपये इतकी आहे.

या घटनेवरून किर्ती भोजक यांनी २४ मे २०२५ रोजी तामलवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून भादंवि कलम ३०३(२) अंतर्गत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित मराठा वधू-वर परिचय मेळाव्यास प्रतिसाद

१५०० वधू-वरांचा सहभाग

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२५ मे -

तुळजापूर शहरातील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ मंगल कार्यालयात रविवार दि. २५ रोजी मराठा सम ाजातील मुलामुलींचे लग्न जुळविणे सोपे व्हावे यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित म राठा समाजातील मोफत वधू-वर परिचय स्नेहमेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'वर्तमानकाळात मुले व मुली उच्चशिक्षित आहेत. लग्नासाठी त्यांच्या व पालकांच्या खूपच अपेक्षा वाढल्या आहेत. त्याम ुळे लग्न जुळविताना आजकाल पालकांना बरेच प्रयत्न व संघर्ष करावे लागतात. मुला-मुलींच्या अपेक्षा वाढल्यामुळे लवकर लग्न जमत नाही, तसेच वय वाढत जाऊन नंतर तडजोड करावी लागते, तर ही तडजोड वेळीच केली तर फारशी अडचण येणार नाही.त्या अनुषंगाने मराठा वधु-वर मेळाव्याचे आयोजन म हाराष्ट्रभर करण्यात येत असून वधु वर पालकांनी लग्न जुळवितासाठी पैशाचा व्यवहार करु नये असे

आवाहन मराठा वधु-वर म ेळाव्याचे संयोजन समितीचे सदस्य अशोक गायकवाड यांनी उपस्थित वधु वर व पालकांना केले. या मेळाव्यात १५०० वधु-वर व पालकांनी सहभाग घेतला. यामध्ये ५६२ मुले व फक्त ७९ मुलींचा सहभाग होता. या मेळाव्यात मोठ्या संख्येनं मराठा समाजातील पालकांनी भाग घेतला असला तरी त्यात विक्रमी ५६२ मुलांचे तर मुलींचे केवळ ७९ परिचय पत्र संयोजन समितीकडे जमा झाल्याने मुलींच्या टंचाईची दाहक स्थिती पुन्हा एकदा समोर आली असल्याचे दिसून आले आहे.

मात्र या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हातोला गावातील महिलांना वॉटरशेडच्या माध्यमातून मिळाला रोजगार

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२५ मे -

वाशी तालुक्यातील हातोला प्रकल्प गावातील महिलांनी आता रोजगाराच्या दृष्टीने म हत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, Watershed Organisation Trust (WOTR), वाशी आणि Standard Chartered Bank यांच्या आर्थिक सहकार्याने सुरु करण्यात आलेल्या 'खवा युनिट' प्रकल्पामुळे महिलांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाला आहे.

या युनिटचा लाभ इंदू उत्तम गवळी, वर्षा संजय गवळी आणि श्रावणी नितीन गवळी या तीन महिलांना मिळाला आहे.

WOTR संस्थेच्या 'मराठवाड्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रात जीवनासाठी जलसुरक्षा प्रदान करणे या व्यापक प्रकल्पाअंतर्गत महिलांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याअंतर्गत हातोला गावात खवा उत्पादन युनिट स्थापन करण्यात आले.

या महिलांना युनिट उभारण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री, प्रशिक्षण, मार्केटिंगसाठी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यात आले. यामुळे या महिलांनी दुग्ध व्यवसायातील उपउत्पादनावर आधारित 'खवा' तयार करून विक्रीस सुरुवात केली आहे. तयार करण्यात येणारा खवा स्थानिक बाजारात विक्रीस उपलब्ध होत असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या युनिटमुळे महिलांच्या घरात नियमित उत्पन्नाचे साधन निर्माण झाले असून त्यांना आर्थिक स्वावलंबनाची दिशा मिळाली आहे. यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे व गावात इतर महिलांनाही प्रेरणा मिळत आहे.

भारताने स्वदेशी शस्त्रांनी दाखविलेली प्रभावी कामगिरी ही या धोरणाची यशोगाथा

ऑपरेशन सिंदुर म्हणजे राजकीय इच्छाशक्ती आणि सैन्यदलांच्या शौर्याचे प्रतीक : प्रदीप बापट (निवृत्त) एअर मार्शल

पुणे (प्रतिनिधी) : केशव माधव न्यास च्या वतीने 'ऑपरेशन सिंदूर'चे विविध पैलू उलगडून दाखविणाऱ्या व्याख्यानाचे आयोजन शनिवारी दिनांक २४ मे रोजी सायंकाळी पटवर्धन बाग येथील 'सेवा भवन' सभागृहात करण्यात आले होते. पहलगाम येथील निष्पाप पर्यटकांवर अतिरेक्यांनी हल्ला केल्यानंतर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदुर अंतर्गत पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानातील नऊ दहशतवादी तळांवर हल्ला करून ते उद्धस्त केले.व सुमारे शंभर अतिरेक्यांचा खात्मा केला या ऑपरेशन सिंदुर पराक्रम अभूतपूर्व'या विषयावर अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष व परम विशिष्ट सेवा मेडल प्राप्त एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) बोलत होते. ते पुढे म्हणाले,जगातील पहिले टॅक्टिकल युद्ध आपण जिंकले. संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक शस्त्रास्त्रे यांचा योग्य वापर,तसेच

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्या दहशतवादी तळांवर अचूक हवाईहल्ले केले व आपल्या भारतीय सैन्याचे विराट शौर्य साऱ्या जगाला दाखवून दिले.ते पुढे म्हणाले कीभारताने स्वदेशी शस्त्रांनी दाखविलेली प्रभावी कामगिरी ही या धोरणाची यशोगाथा आहे.ऑपरेशन सिंदुर हे शीर्षक देखील योग्य ठरवले गेले.या मोहिमेत भारताने अत्याधुनिक क्षेपणास्त्रे,लढाऊ विमाने आणि स्वदेशी बनावटीची संरक्षकप्रणाली यांचा प्रभावी वापर केला.पाकिस्तानने वापरलेली चिनी व तुर्की बनावटीची यंत्रणा भारतीय तंत्रज्ञानापुढे टिकू शकली नाही.भारताच्या ड ४००, आकाश,आकाशतीर,आणि ब्रह्मोस या प्रणालींनी सर्व हल्ले अडवले.आकाशतीर ही भारतात बनलेली,अत्याधुनिक स्वयंचलित सुरक्षाप्रणाली यावेळी विशेष चर्चिली गेली.ह्या तंत्रज्ञानामुळे शत्रूंचे हल्ले थोपविले तसेच संपूर्ण जगाला भारतीय सैन्यदलांच्या शौर्याचे दर्शन घडवले गेले.

विंग कमांडर अविनाश मुठाळ (निवृत्त) ह्यांनी झझढ द्वारे ऑपरेशन सिंदुर ह्याची माहिती प्रभावी शैलीत उलगडून दाखवली व अभ्यासपूर्ण माहिती उपस्थितांना दिली.

विंग कमांडर अविनाश मुठाळ म्हणाले की,ऑपरेशन सिंदुर जागतिक सर्वोत्तम युद्धांपैकी एक असून आत्मनिर्भर भारत अंतर्गत शस्त्रांची मारक क्षमता सिद्ध करून दाखवली आहे.भारताने *ऑपरेशन सिंदुर* मार्फत 'सायकॉलॉजिकल व इन्फॉर्मेशन वॉर फेअर' चे उत्तम दर्शन घडवले.कर्नल सेफिया कुरेशी व विंग कमांडर व्योमिका सिंह यांच्यामार्फत युद्धाची अद्ययावत माहिती देऊन पाकिस्तानवर दबाव आणला व त्यांचा अजेंडा हाणून पडला.आपली इंटिग्रेटेड डिफेन्स सिस्टीम एकदम मजबूत असल्याने त्यांनी केलेले सर्व हल्ले आपण परतावून लावले.त्यांच्या नऊ दहशतवादी तळांवर हल्ला करून ते उध्वस्त केले तसेच सुमारे शंभर अतिरेक्यांचा खात्मा केला.व पाकिस्तानला नामोहरम केले.यामुळे जागतिक संरक्षण बाजारपेठेमध्ये आपल्या शस्त्रांची मागणी वाढलेली आहेअसेही ते पुढे म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशव माधव न्यासचे अध्यक्ष सदानंद भागवत हे होते.

भारतीय सैन्याच्या शौर्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा व्याख्यान आयोजनाचा उद्देश होता.

ह्या व्याख्यानास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगरचे संघचालक उदयन पाठक, अविनाश वजल,डॉ सुनील पुणतांबेकर,बाळकृष्ण काळे,डॉ सतीश जोशी ह्यांच्यासह राज्यातील अनेक पूर्व सैन्याधिकारी,नागरिक,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रारंभी केशव माधव न्यासचे सचिव अरविंद देशपांडे ह्यांनी संस्थेच्या केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना

दिली.अध्यक्ष सदानंद भागवत ह्यांचे हस्ते एअर मार्शल प्रदीप बापट यांचा तर अरविंद देशपांडे यांचे हस्ते विंग कमांडर अविनाश मुठाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.कार्यक्रमाचे सूत्र संचलन केशव माधवचे विश्वस्त योगेश कुलकर्णी यांनी केले.प्रकाश देशपांडे यांनी आभार मानले.

गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

तभा वृत्तसेवा

कन्नड: तालुक्यातील उपळा येथे मध्यप्रदेशातील मजुराने गळफास घेऊन शनिवारी रात्री आत्महत्या केली जगभान भागचरण लोधी (वय २५ वर्ष रा. नयाखेडा ता. बसई जि. दतिया मध्यप्रदेश) असे मृत व्यक्तीचे नाव आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार उपळा येथे राधाकृष्णा सांडु पवार (रा.हर्सुल पिसादेवी रोड छत्रपती संभाजीनगर) यांनी काम घेतलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या कामासाठी आलेला मजूर जगभान भागचरण लोधी याने शनिवारी रात्री ९: ३० वाजेच्या सुमारास नयाखेडा मध्यप्रदेश पत्नीस फोन करून कळवले की आत्महत्या करत आहे व त्यानंतर मध्यरात्री अंब्याच्या झाडा दोरीच्यासह्याने गळफास घेतलेला अवस्थेत आढळुन आल्याने त्यास

पोहेकॉ धीरज चव्हाण व इतर मजुराच्या साह्याने उपचारार्थ ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे दाखल केले असतावैद्यकीय अधिकारी डॉ सोहेल शेख यांनी तपासुन जगभान यास मयत घोषीत केले आहे.

घरा जवळील विटा व खडी उचलण्यास सांगितली म्हणून मारहाण

तभा वृत्तसेवा

कन्नड : तालुक्यातील भांबरवाडी तांडा येथे घरा समोर टाकलेल्या विटा व खडीमुळे नातीस दुखापत होईल असे सांगणाऱ्या महिलेस मारहाण केली व धमकावल्या प्रकरणी दोघा विरुद्ध कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुल्हा दाखल करण्यात आला आहे. रेखा उखा राठोड वय ६०, रा भांबरवाडी तांडा यांच्या फिर्यादी वरून लिमचंद मगन चव्हाण व उषाबाई लिमचंद चव्हाण रा. भांबरवाडी तांडा यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेखा राठोड यांनी आरोपी लिमचंद चव्हाण व उषाबाई चव्हाण यांना घरा समोर टाकलेली विटा व खडी उचलुन घ्या, माझी नात खेळतांना त्यात पडुन तिला जखम होईल असे सांगण्यासाठी गेले असता आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देत लाथाबुक्याने व काठीने मारहाण करत हातास गंभीर दुखापत केल्या प्रकरणी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार धीरज चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

गावठी कट्टा बाळगणाऱ्या युवकाला पकडले

गंगापूर दि.२५: गंगापूर लासुर रस्त्यावरील तांदूळवाडी येथे एका युवकाला पोलिसांनी पकडले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांना गुप्त खोबऱ्याच्या मार्फत माहिती मिळाली की गंगापूर लासुर रस्त्यावरील तांदूळवाडी जवळ एक युवक गावठी पिस्तूल घेऊन उभा आहे. या कामी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी व शिल्लेगाव पोलिसांच्या मदतीने सापळा रचून तांदूळवाडी जवळील बंद पडलेल्या हॉटेलच्या रस्त्यावर एक युवक उभा असल्याचा त्यांना आढळून आला. त्यांनी युवकाला झडप घालून पकडले असता त्याची झेडपी घेतली असता त्याच्याजवळ एक गावठी कट्टा व दोन जिवंत काढतूस असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. यावरून पिस्तूल बाळगणारा अमोल राऊसाहेब विटनोर (वय २७) रा.मांजरी ता. नेवासा जि. अहिल्यानगर. या आरोपीला ताब्यात घेऊन त्याचे विरोधात भारतीय हत्यार कायद्यानुसार शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष वाघ, शिल्लेगाव पोलीस निरीक्षक सलीम चाऊस सह सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे, फौजदार दीपक पारदे, जमादार नामदेव शिरसाठ, वाल्मीक निकम, विठ्ठल डाके, शिवानंद बंगे, अशोक वाघ, संजय तांदळे, बेंद्रे, निसर्ग, धारबळे हे पुढील तपास करीत आहे.

वीस वर्षानंतर जुने वर्गमित्र पुन्हा एकत्र

तभा वृत्तसेवा

पैठण दि २५ : पैठण शहरात असलेल्या श्रीनाथ हायस्कूल या ठिकाणी सन २००५ मधील इयत्ता १० वी चा स्नेहमिलन मोठ्या उत्साहात पार पडले. वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला शाळेत शिक्षण घेऊन शासकीय निमशासकीय सेवेत आपले कार्य करत आहेत, यात प्रामुख्याने अभिनेता सह पोलीस निरीक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, इत्यादी वेगवेगळ्या पदावरती आपली सेवा देत आहे या निमित्ताने शिक्षक व विद्यार्थ्यांचे गौरव करण्यात आले. या स्नेहमिलनात शाळेतील शिक्षक वृंदांनी मार्गदर्शन केले व जुन्या आठवणींना उजाळा दिला

कार्यक्रमानिमित्त निवृत्त प्राचार्य परळकर याप्रसंगी अध्यक्ष म्हणून लाभले होते. तसेच शिक्षक वृंदांनी यावेळी मार्गदर्शन करून जुन्या आठवणींना उजाळा दिला प्रसंगी सूत्रसंचालन बाळू मामाच्या नावानं चांगभलं फेम अभिनेता अक्षय टाक व प्रीतम साबू यांनी विद्यार्थ्यांना खळखळून हसवले. आभार स्वामी जाधव यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैभव शिरवत,सचिन पांडव, उद्धव ढेरे, शंकर घोडके, संदीप कस्तुरे, किरण गायकवाड,पोलीस ठाण्याचे राजेश आटोळे पीएसआय श्रीकांत चव्हाण रामेश्वर झिरपे, कल्याणी बेतवार धनश्री कोळपकर नेहा धोकटे सुजाता लवांडे डॉक्टर अमित भांडेकर विशाल बोरुडे गजानन राऊत मयूर गावंडे, ज्ञानेश गाडेकर, सतीश खरात. इत्यादी विद्यार्थ्यां सहभागी सहभागी झाले होते.

कत्तलखान्यात जाणाऱ्या प्राण्यांचे वाचवले प्राण

तभा वृत्तसेवा

कन्नड :- कन्नड ग्रामीण पोलिसांनी शनिवारी सांयकाळी पावनेसहा वाजेच्या सुमारास धड़क कारवाई करत राष्ट्रीय महामार्गावरील भांबरवाडी नाका जवळ बोलेरो पिक अप (एमएच१९ सीवाय ०२६८) वाहनामध्ये एक बैल (गोवंश) व दोन गाई अवैध रित्या वाहनात छळ होईल व त्यांना वाहनात उभे राहण्यास त्रास होईल अशा पध्दतीने निर्दयीपणे कोंबुन भरुन त्यांची कत्तल करण्याच्या ईरादयाने, विनापरवाना वाहतुक करतांना पकडण्यात आले.

या प्रकरणी अल्ताफ फकिरा सय्यद कुरेशी (वय३८, रा.सिध्दीक चौक जवळ कसाबवाडा कन्नड व पिक अप चालक रोहीत चौधरी वय ३०, रा.रांजणगाव ता.चाळीसगाव यांना अटक करण्यात आली आहे.

कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस अंमलदार ललीत पवार यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शना खाली बीट जमादार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

खरिपासाठी कृषी विभाग सज्ज; कृषी सहायक संपावर सल्ला देणार कोण ? : संप मिटण्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ मे : खरीप हंगामासाठी सोयगाव तालुका कृषी विभाग सज्ज झाला असला तरी शेतकरी व कृषी विभागाचा दुवा असलेला कृषी सहायक ऐन हंगामात संपावर गेला आहे. यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. आता हा संप कधी मिटेल, ही शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे. विविध मागण्यांसाठी कृषी सहायक १५ मेपासून संपावर गेले आहेत.सोयगाव तालुक्यातील १० कृषी सहायक व ७ कृषी सेवक या संपात सहभागी आहेत. कृषी सेवक पदाचा तीन वर्षांचा कालावधी रद्द करावा, ऑनलाइन कामासाठी लॅपटॉप मिळावा, कृषी सहायक पदनाम बदलून सहायक कृषी अधिकारी असे करावे, नैसर्गिक आपत्तीच्या पंचनाम्याची कार्यपद्धती तयार करावी, कृषी सहायकांना मदतनीस मिळावा, कृषी निविष्ठा वाटपामध्ये सुसूत्रता आणावी, यांसह विविध प्रमुख मागण्या कृषी सहायकांच्या आहेत. सोयगाव तालुक्यातील ८७ गावांसाठी १७ कृषी सहायक आहेत.

कामे झाली ठप्प : खरीप व रब्बी हंगामापूर्वी तसेच हंगाम कालावधीत शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून आवश्यक असणारे बी-बियाणे, शेती यांत्रिकीकरणासाठी नाव नोंदणी करणे, बीज प्रक्रिया, सुधारीत वाण, कीड नियंत्रण ही सर्व कामे कृषी सहायक करत असतात. ऐन हंगामात ते संपावर गेल्याने शेतकऱ्यांना मौलिक सल्ला मिळणे बंद झाले आहे

कॅरेन्स क्लॅव्हिससाठी किमतींची घोषणा

मुंबई: किया इंडिया या आघाडीच्या मास-प्रीमियम ऑटोमेकरने आज भारतातील ग्राहकांसाठी त्यांची बिग, बोल्ड फॅमिली वेईकल नवीन किया कॅरेन्स क्लॅव्हिस ११.४९ लाख रूपयांच्या आकर्षक सुरूवातीच्या किमतीमध्ये लाँच केली. आधुनिक, मोठ्या कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आलेली ही प्रीमियम उत्साहवर्धक वेईकल एमपीव्ही व एसयूव्हींमधील तफावत दूर करते. आकर्षक एक्स्टीरिअर, ऐसपैस इंटीरिअर आणि प्रगत वैशिष्ट्ये असलेली कॅरेन्स क्लॅव्हिस आरामदायीपणा, वैविध्यता आणि स्टाइलचा शोध घेत असलेल्या आधुनिक काळातील कुटुंबांच्या गरजांची पूर्तता करते.

पीबीपार्टनर्सच्या आरोग्य विम्याने महाराष्ट्रात ५२ टक्के विक्रमी वाढीची नोंद केली

मुंबई - पीबीपार्टनर्स ही पॉलिसीबाजारची पीओएसपी शाखा महाराष्ट्रात झपाट्याने विस्तार करत आहे, जेथे मुंबई अग्रस्थानी आहे. शहरात नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत हेल्थ इन्शुरन्सचे नॅशनल सेल्स हेड श्री. नीरज अधाना यांनी राज्यात आरोग्य विम्याच्या वाढत्या अवलंबनाला निदर्शनास आणले. महाराष्ट्रात १७,००० हून अधिक एजंट भागीदार आहेत, ज्यापैकी मुंबईमध्ये ६,००० हून अधिक एजंट भागीदार आहेत, ज्यामुळे पश्चिम भागामध्ये विमा प्रवेशाला गती मिळत आहे.

ऑपरेशन सिंदूर आमच्या अस्मितेचे यश : डॉ. तसनीम पटेल

ऑपरेशन सिंदूर नंतर मुस्लिम राष्ट्रीय मंच महिला विभागाच्या राष्ट्रीय संयोजिका डॉ. तसनीम पटेल यांच्या काय भावना आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला 'तरुण भारत'ने

तभा. वृत्तसेवा/(नारायण गायकवाड)

छत्रपती संभाजीनगर : भारताचे स्वित्झर्लंड म्हणून ओळख असलेल्या जम्मू कश्मीर मधील अनंतनाग जिल्ह्यातील पहेलगाम पासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या बैसरन या ठिकाणी २२ एप्रिल २०२५ रोजी सुट्टीची मजा घेत असलेल्या पर्यटकांवर अतिरेकी हल्ला झाला. यामध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटकांसह २६ निष्पाप पर्यटकांनी जीव गमावला.

दहशतवादी हल्ल्यातील शहीद लोकांच्या स्मरणार्थ मोदी सरकारने दहशतवाद्यांना प्रत्युत्तर म्हणून ६ मे ते ७ मे च्या मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर राबवले. ऑपरेशन सिंदूर मध्ये भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकअधिकृत कश्मीर मधील ९ ठिकाणी हवाई हल्ले करत दहशतवादी तळ, प्रशिक्षण केंद्रे व दहशतवादाशी संबंधित क्षेत्र नष्ट केली.

या ऑपरेशन सिंदूर नंतर पाकिस्तानने नागरिक, धार्मिक स्थळे, लहान मुलं यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप भारतावर केला.

मात्र भारताने पाकिस्तानचे आरोप फेटाळत अतिरेकी स्थळ सोडले तर नागरिकांवर असा कोणताही हल्ला केल्याचे आरोप फेटाळून लावल्याचे सांगत मिशन सिंदूर आमच्या अस्मितेचे यश असल्याचे मुस्लिम राष्ट्रीय मंच महिला विभागाच्या राष्ट्रीय संयोजिका डॉ. तसनीम पटेल यांनी तरुण भरात शी बोलताना सांगितले. ऑपरेशन सिंदूर नंतर आपल्या देशातील मुस्लिम नेत्यांची ऑपरेशन सिंदूर यावर काय भावना आहे? हे जाणून घेण्यासाठी तरुण भारत ने त्यांची मुलाखत घेतली.

प्रश्न – नमस्कार ! पाकिस्तान एक मुस्लिम बहुल राष्ट्र आहे आपण मुस्लिम राष्ट्रीय मंच महिला विभागाच्या संयोजिका आहात मिशन सिंदूर कडे आपण कसे पाहाल?

डॉ. तसनीम पटेल – नमस्कार ! १९४७ पर्यंत अखंड भारत होता, त्यात काही मोजक्या राजकारण्यांनी एकत्र येत देशाचे विभाजन केले आणि पाकिस्तान निर्माण झाला. अखंड भारत आपल्याला मिळू शकला नाही हे शल्य आजही प्रत्येक भारतीयांच्या मनात आहे. त्याचप्रमाणे माझ्यासारख्या मुस्लिमांमध्ये ही आहे. काही लोकांचा निर्णय आणि पाकिस्तान निर्माण झाला. भारताचा मुसलमानही या देशाचा नागरिक आहे मात्र या विभाजनामुळे तो दुय्यम झाला काय ही भीती त्याच्या मनात होते. १०-१५ वर्षापूर्वी आम्ही जमात उलेमान हिंद ,मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड हेच आमचा भाग आहे असे मानत होतो. मात्र आज मुस्लिम समाजही संविधानाकडे वळत आहे. जगायचे येथे आणि मरायचे ही येथेच आहे मग या देशाशी गद्दारी का करायची? तीन तलाक असेल की वफ्फ बोर्ड, कायदा पारित झाला. मग याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदींना जाते. समान नागरी कायदा यावरही सभागृहात चर्चा झाली. आता मुस्लिम प्रत्येक गोष्टीत विरोध करत नाहीत.हे हेरत मात्र पहलगाम येथील निरआपराध पर्यटकांवर धर्म विचारत हल्ला करण्यात आला, त्यामागेही आपल्या देशातील हिंदू - मुस्लिम यांच्यात दरी निर्माण करण्याचा त्यांना हेतू होता. या ठिकाणी निरापराध पर्यटकांना आपला जीव गमवांवा लागला. असे कृत्य मुस्लिम धर्म कधीही मान्य करत नाही, देशा देशाची द्वेष भावना आपण समजू शकतो पण त्यांच्या निरापराध लोकांच्या आंनंदी जीवनात निर्घृण हल्ला करणे हा कोणत्याही धर्माला मान्य नसलेला भिरकड पणा आहे.आपली सुरक्षा यंत्रणा सक्षम आहे त्यांनी जशास तसे उत्तर दिले. पाक व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तान मधील दहशतवाद्यांचे अड्डे आपल्या हवाई दलाने उद्धस्त केले. तिन्ही दलांनी आपली कार्य योग्य बजावली आहेत.

प्रश्न –ऑपरेशन सिंदूर ही कारवाई भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी किती महत्त्वाची होती?

डॉ. तसनीम पटेल – राष्ट्रीय सुरक्षा ही केव्हाही अव्वल स्थानी आहे कारण राष्ट्र प्रथम हे आपले ध्येय आहे. त्या बाबतीत कोणतीही तडजोड नाही. जगा आणि जगू द्या याप्रमाणे आपण वागत आलो आहोत. पण कोणी आपल्या चांगुलपणाचा अंत पाहत असेल तर जशास तसे उत्तर देण्यासाठी आपली यंत्रणा, लष्कर आणि आपले सरकार सक्षम आहे. आणि त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऑपरेशन सिंदूर.

ऑपरेशन सिंदूरचे खास वैशिष्ट्य असे की भारत मातेच्या लेकीचे कुंकू पुसले, आपण भारत मातेला आई म्हणून बघतो तिच्या लेकीच्या कपाळाला उजाड करणाऱ्या नराधमांना धडा शिकवण्यासाठी ऑपरेशन सिंदूर करून त्यांना योग्य उत्तर देण्यात आले आहे.

ज्यांनी या देशातील लेकींची अस्मिता हिसकावली त्यांना सोडायचे नाही या भावनेने ऑपरेशन सिंदूर करत या दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले. आपण कोणत्याही नागरी वस्तीवर हल्ले केले नाही. हे करत असताना आपण माणुसकी सोडली नाही बदला घेताना नराधमांना शिक्षा व्हावी निरापराध्याना होऊ नये याची दक्षता भारतीय सेनेने आणि भारत सरकारने घेतली ,मात्र पाकिस्तानने वस्त्यांवर ड्रोन हल्ला करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आपण सक्षम असल्याने तो परतून लावला.

प्रश्न – आपण मुस्लिम राष्ट्रीय मंच महिला विभागाच्या राष्ट्रीय संयोजिका आहात, या दहशतवाद विरोधी कारवाईला अल्पसंख्यांक समुदायाने कसे पाहिले आपणास वाटते?

डॉ. तसनीम पटेल – माझा जन्म १९५६ चा आहे, संविधानावर माझी कठोर निष्ठा आहे. वयाप्रमाणे वाढत गेले तशी काही युद्धही पाहण्यात आली. त्या युद्धात मला कमी अधिक फरकाने भारतीय जनतेत मतभेद दिसायचे पण ऑपरेशन सिंदूरच्या वेळी सर्वजण एकजुटीने सरकार आणि सैन्याच्या पाठीशी होते कोणताही अल्पसंख्यांक म्हणाला नाही की झाले ते नाटक आहे, यामागे काही नीती आहे, असे काही घडलेच नाही, यांनी विनाकारण लोक मारले असे कोणी म्हणाले नाही प्रत्येकाचे म्हणणे होते की कठोर शासन झाले पाहिजे हा बदल अल्पसंख्यांक समुदायात प्रकर्षाने जाणवला. मोहम्मद इलियासी हे उल्लेमा संघटनेचे राष्ट्रीय स्तरावरील अध्यक्षपदावर असलेले त्यांनी तर फतवाच काढला की दहशतवादी कृत्य करेल आणि मरेल त्यांना गाडण्यापूर्तीही जमीन देऊ नका, आई-वडिलांनी त्यांच्यावर अधिकार करू नये, ठीक - ठिकाणी मुस्लिम समुदायाने ऑपरेशन सिंदूरच समर्थ केले व पाकिस्तानचा तीव्र निषेध केला.

प्रश्न –मराठवाड्यातून ऑपरेशन सिंदूर वर मुस्लिम समुदायातून चर्चा करण्यासाठी कोणतेही मोठे नेते समोर आल्याचे दिसले नाही?

डॉ. तसनीम पटेल – माझ्या मते कदाचित प्रसार माध्यम त्याच्यापर्यंत गेली नाहीत किंवा प्रसार माध्यमांपर्यंत ते पोहोचू शकले नाहीत असे झाले आहे, मीडियासमोर आले नाहीत मात्र देशाच्या पाठीशी मुस्लिम समुदाय खंबीरपणे उभा आहे असे मला वाटते. ही पहिली वेळ आहे की सर्व नेते संघटित होऊन पाकिस्तानचा धिक्कार करत आहेत.

प्रश्न – मुस्लिम राष्ट्रीय मंचच्या भूमिकेविषयी थोडसं सांगा

डॉ. तसनीम पटेल – थोडक्यात सांगायचे झाले तर यावेळी दुर्दैवाने कोणत्याही मुस्लिम नाही तर काही हिंदू लोकांनीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संशय व्यक्त केला, .मुस्लिमांनी पाहिले की निरपराध लोकांची हत्या झाली, वाचवण्यास गेले तेही मुसलमानच होते, २०१४ नंतर सर्वांना प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणे मुस्लिम राष्ट्रीय मंच यांची भूमिका महत्त्वाची आहे. मंचाने सातत्याने मुस्लिमांना दाखवले आहे की सैताना बरोबर गेला तर नुकसान तुमचे आहे आणि साधुसंतांबरोबर आला तर फायदाच आहे. समाज कोणताही असू द्या अमन आणि भाईचारा हा आपल्या देशात आहे इतर कोणत्याही देशात नाही हे प्रकर्षाने समाजामध्ये सिद्ध केल्यामुळे मुस्लिम राष्ट्रीय मंच ची भूमिका यामध्ये महत्त्वाचे आहे.

धन्यवाद!

डॉ. तसनीम पटेल यांच्याविषयी थोडक्यात..

डॉ. तसनीम पटेल यांच्या शिक्षणची सुरुवात नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील अर्जापुर येथील पानसरे महाविद्यालयात झाली. परिस्थिती थोडी हालाखीची असल्याकारणाने आणि शिकण्याची जिद्द पाहता नरहर कुरुंदकर यांनी माणस कन्या मानून त्यांना नांदेड येथे राहण्याची व्यवस्था करून दिली. पुढे पीपल् कॉलेज येथे शिक्षण घेत १९७८ ला ज्या महाविद्यालयात शिक्षणाची सुरुवात केली तेथेच प्राध्यापिका म्हणून रुजू झाल्या. १९९९ ते २००२ या कालावधीत समाज कल्याण महामंडळाच्या अध्यक्ष म्हणून ही काम पाहिले. दिल्ली येथे भाईसाहेब कळसे यांची भेट घेत त्या मुस्लिम राष्ट्रीय मंच महिला विभागाच्या सध्या राष्ट्रीय संयोजका म्हणून काम पाहत आहेत.

कॅरेन्स क्लॅव्हिससाठी किमतींची घोषणा

मुंबई: किया इंडिया या आघाडीच्या मास-प्रीमियम ऑटोमेकरने आज भारतातील ग्राहकांसाठी त्यांची बिग, बोल्ड फॅमिली वेईकल नवीन किया कॅरेन्स क्लॅव्हिस ११.४९ लाख रूपयांच्या आकर्षक सुरूवातीच्या किमतीमध्ये लाँच केली. आधुनिक, मोठ्या कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आलेली ही प्रीमियम उत्साहवर्धक वेईकल एमपीव्ही व एसयूव्हींमधील तफावत दूर करते. आकर्षक एक्स्टीरिअर, ऐसपैस इंटीरिअर आणि प्रगत वैशिष्ट्ये असलेली कॅरेन्स क्लॅव्हिस आरामदायीपणा, वैविध्यता आणि स्टाइलचा शोध घेत असलेल्या आधुनिक काळातील कुटुंबांच्या गरजांची पूर्तता करते.

कार्यालय नगरपंचायत सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर

जाहीर निविदा सूचना- शुध्दीपत्रक

नगरपंचायत सोयगाव सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षा करिता नगरपंचायत सोयगाव च्या विविध विभागाकरिता कार्यालयीन कामाकरीता विविध साहित्य खरेदी व वाहन पुरवीने इत्यादी कामे करणे करिता दि.१६/०४/२०२५ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु काही कारणांमुळे सदर सुचनेचा कालावधी हा मागील दिनांका ऐवजी पुढील प्रमाणे गृहीत धरण्यात येऊन पुढील निविदेसह आपल्या निविदा सादर करण्यात याव्या.

१	न.पं. कार्यालयात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणे.	रु. ३००/-अनामत	रु.१००/- कोरी निविदा

दिनांक २६/०५/२०२५ पासुन दिनांक ०२/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सार्वजनिक सुट्टीसह.

स्वाक्षरीत /-
(संभाजी देशमुख)
प्र. मुख्याधिकारी नगरपंचायत सोयगाव

रोखठोक

दिनेश गुणे

नक्षलवादाच्या अस्ताचा आरंभ!

महाराष्ट्राच्या दृष्टीने २०२५ या वर्षाचा पहिला दिवस ऐतिहासिक ठरला. १ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गडचिरोली दौऱ्यात जवळपास डझनभर जहाल माओवादी नेत्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर शस्त्रे खाली ठेवून शरणागती पत्करली आणि केंद्र सरकारच्या माओवादमुक्त भारत मोहिमेच्या यशोगाथेचे आणखी एक पान महाराष्ट्रात लिहिले गेले. मध्य भारतातील नक्षली गटांचा म्होरक्या भूपती याची पत्नी विमला चंद्रा सिडाम ऊर्फ तारा ऊर्फ वत्सला ऊर्फ ताराक्का हिने दहा जहाल नक्षल्यांसमवेत देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊन महाराष्ट्रातील आणि दंडकारण्यातील नक्षली चळवळीच्या नाड्या शिथिल केल्या. ताराक्का आणि तिच्यासह दहा माओवाद्यांच्या आत्मसमर्पणामुळे मध्य भारतातील अतिरेकी नक्षली चळवळीचे खच्चीकरण झाले. गेल्या सुमारे चार दशकांपासून नक्षली कारवायांत सक्रिय असलेली ६२ वर्षांची ताराक्का ही पहिली महिला नक्षली म्हणून ओळखली जात होती. माओवादी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या केंद्रीय समितीचा सदस्य असलेल्या सोनूची पत्नी आणि पश्चिम बंगालमध्ये सुरक्षा दलांसोबतच्या चकमकीत ठार झालेला जहाल नेता किशनजी याची वहिनी असलेल्या ताराक्काचा महाराष्ट्र, तेलंगणा, छत्तीसगड, ओडिशा या राज्यांमधील जवळपास पावणेदोनशेहून अधिक नक्षलवादी कारवायांमध्ये सहभाग होता आणि तिच्या अटकेसाठी या राज्यांनी एकूण एक कोटी रुपयांची बक्षिसे जाहीर केली होती. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या शरणागती कार्यक्रमामुळे नक्षल्यांचा गेल्या जवळपास ४५ वर्षांचा हैदोस खिळखिळा झाला आणि माओवादाच्या दहशतीपासून मुक्तीचा मार्ग विस्तृत झाला. येत्या वर्षभरात देशातून माओवादी चळवळीचा अंत झालेला असेल, असा केंद्र सरकारचा विश्वास आहे. या मोहिमेत महाराष्ट्रातील सुरक्षा यंत्रणा आणि राज्यातील महायुती सरकार केंद्र सरकारच्या खांद्याला खांदा लावून उतरलेली असल्याने, गेल्या पाच महिन्यांत महाराष्ट्राच्या सीमेभोवती सुरक्षा यंत्रणांनी सुरू केलेल्या माओवाद्यांच्या मुसक्या आवळण्याच्या मोहिमेस यश येत आहे. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने नक्षलवाद्यांच्या विरोधात सर्वंकष मोहीम सुरू केली आहे. खुद्द केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे नक्षलग्रस्त राज्यांतील मोहिमांचा समन्वय साधत असल्याने या मोहिमेस सुसूत्रता प्राप्त झाली असून, गेल्या काही दिवसांतील जहाल नक्षल्यांचे अड्डे नेस्तनाबूत करण्याच्या मोहिमांचे यश पाहता, नक्षलमुक्तीची पहाट आता जवळ येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. एका बाजूला गतिमान मोहिमा आखणे, दुसरीकडे स्थानिक जनतेस विश्वासात घेणे आणि नक्षलग्रस्त भागांत विकासाचे प्रकल्प राबवून रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करणे, नक्षलवादी आणि त्यांना मदत करणाऱ्यांच्या विरोधात प्रभावी कारवाई करणे व शरणागती पत्करणाऱ्या नक्षलवाद्यांना सन्मानाने समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी त्यांचे भविष्य निर्भर करण्याच्या योजना राबविणे आणि नक्षली चळवळीचा बीमोड करणाऱ्या सुरक्षा यंत्रणांची सज्जता वाढविणे अशा बहुपेडी कार्यक्रमांतून नक्षलमुक्तीच्या या मोहिमांची रणनीती आखली जात असल्याने ही लढाई आता विजयाच्या अंतिम टप्प्यात आली आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात या कारवायांमध्ये झालेली लक्षणीय घट आणि नक्षलवाद्यांच्या अड्ड्यांवरील प्रभावी कारवायांचा वेग वाढल्याने, नक्षलग्रस्त भागातील जनतेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना आता सुरक्षिततेच्या भावनेने आश्वस्त झाली आहे आणि दुसरीकडे नक्षलवाद्यांचे मनोधैर्य खच्ची होत चालले आहे. याच काळात नक्षलवाद्यांच्या कारवायांमध्ये २०१ नागरिकांनी प्राण गमावले, तर ५७ नक्षलवादी ठार झाले. २८४ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले, तर ४८१ नक्षलवाद्यांच्या सुरक्षा यंत्रणांनी मुसक्या आवळल्या.

गेल्या २१ एप्रिल ते २२ मे या महिनाभराच्या काळात सुरक्षा यंत्रणांनी देशाच्या नक्षलवादविरोधी मोहिमेतील सर्वांत मोठे यश संपादन करून या चळवळीच्या अस्ताचा आरंभ केला आहे. छत्तीसगड आणि तेलंगणाच्या सीमेवरील डोंगरी भागात केंद्रीय राखीव पोलिस दले, विशेष कार्य पथके, जिल्हा राखीव दल यांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईत १६ महिला नक्षलवाद्यांसह ३१ नक्षलवाद्यांना यमसदनास पाठविले आणि नक्षलमुक्त झालेल्या परिसरात नव्या सुरक्षा चौक्या उभ्या राहिल्या. छत्तीसगडच्या नक्षलग्रस्त जिल्ह्यांतही याच यशाची पुनरावृत्ती झाली. एका कारवाईत २२ जहाल नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली आणि या कारवाईत मोठ्या प्रमाणावर शस्त्रे, स्फोटके हस्तगत करण्यात आली. या कारवायांमुळे नक्षल्यांचे मनोधैर्य खचले असून आता आत्मसमर्पण किंवा प्राणार्पण एवढे दोनच पर्याय त्यांच्यासमोर असल्याची जाणीव त्यांना झाली आहे. सुकमा जिल्ह्यात ३३ जहाल नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करून शस्त्रे खाली ठेवली आणि या बडेसेट्टी नावाच्या नक्षलग्रस्त गावास नक्षली विळख्यातून मुक्त करण्यात आले. नक्षलमुक्तीचा आनंद साजरा करणारी ही त्या भागातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

डावा दहशतवाद किंवा माओवाद म्हणून ओळखला जाणारा हा अतिरेकी हिंसाचार म्हणजे देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेपुढील सर्वांत मोठा धोका आहे. अविकसित भागांतील विकास प्रकल्पांमध्ये अडथळे आणून तेथील बेरोजगारीसारख्या समस्या कायम राहिल्या तरच असंतुष्ट तरुणांना या चळवळीत ओढता येईल, हे ओळखून माओवाद्यांनी डोंगरी भागांत विशेषतः आदिवासीबहुल क्षेत्रांत विकासाच्या प्रत्येक योजनांमध्ये सातत्याने अडथळे आणले आहेत. सशस्त्र क्रांतीचे खूळ डोक्यात पेरून बेरोजगार आणि समस्याग्रस्त तरुणांची माथी भडकवणे आणि सुरक्षा यंत्रणांना लक्ष्य करून समांतर

शासनव्यवस्था उभी करत देशाच्या लोकशाही व्यवस्थेसमोर आव्हान उभे करणे हे या चळवळीचे लक्ष्य आहे. सुमारे सहा दशकांपूर्वी, सन १९६७ च्या दरम्यान पश्चिम बंगालमध्ये नक्षलबारी आंदोलनातून जन्म घेतलेल्या या हिंसक चळवळीने कालांतराने अशाच पद्धतीने तरुणांना जाळ्यात ओढून त्यांची माथी भडकविली आणि छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेशासारख्या राज्यांत आपले पाय रोवले. गरिबांना धनदांडग्यांच्या पिळवणुकीतून मुक्त करण्याच्या विचाराचा गोंडस मुखवटा धारण केलेल्या या चळवळीने आतापर्यंत निष्पाप, गरीब कुटुंबाचेच सर्वाधिक बळी घेतले असून, या कुटुंबांवरील नक्षली अत्याचाराच्या कहाण्यांनी असंख्य गावे आजही थरकापलेली आहेत. सशस्त्र हिंसाचार, खंडणी वसुली, सामाजिक व्यवस्थेची घडी उद्ध्वस्त करणे आणि लहान मुले व सामान्य नागरिकांना सक्तीने चळवळीत ओढणे या माओवाद्यांच्या कार्यपद्धतीमुळे असंख्य गरीब कुटुंबे कायमची उद्ध्वस्त झाली आहेत. समाजव्यवस्थेची घडी बिघडविणारी ही चळवळ कायमची नष्ट करण्याचा केंद्र सरकारचा संकल्प आता पूर्ततेच्या नजीक येऊन दाखल झाला आहे. नक्षलवाद हा देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेसमोरील सर्वांत मोठा धोका आणि सामाजिक व्यवस्थेपुढील सर्वांत मोठे संकट आहे, असे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी एप्रिल २००६ मध्ये म्हटले होते. म्हणजे, गेल्या वीस वर्षांत हे संकट फोफावले, देशाच्या अंतर्गत सुरक्षेलाच जबर आव्हान उभे राहिले आणि तब्बल वीस वर्षांनंतर, सरकारच्या कठोर उपाययोजना आणि दृढसंकल्पामुळे त्याच्या अस्ताचे स्पष्ट संकेत दिसू लागले. गेल्या केवळ तीन वर्षांत, २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये आंध्र, तेलंगणा, छत्तीसगड, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल या राज्यांतील सुमारे १४०० जणांनी नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात जीव गमावले. या हिंसाचाराचा सर्वाधिक फटका छत्तीसगडला बसला असून जवळपास ८०० नागरिकांची नक्षली हिंसाचारात हत्या झाली आहे. आता कारवाईने वेग घेतला असून ३१ मार्च २०२६ पूर्वी या देशातून नक्षलवाद नावाची लाल कीड कायमची नष्ट केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशाला दिली आहे. विकासाच्या प्रकल्पांसमोरील अडथळे, शिक्षणव्यवस्था, आरोग्यसेवा, दूरसंचार संपर्कयंत्रणा, बँकिंग सुविधा आणि टपाल सेवांना प्रवेशबंदी करून आपल्या दहशतीने समांतर शासनव्यवस्था उभी करणारी ही वाळवी संपणार या भावनेने देश आश्वस्त झाला आहे. गेल्या आठवड्यात छत्तीसगडच्या नारायणपूरमध्ये सुरक्षा यंत्रणांनी माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस नंबाला केशवराज ऊर्फ बसवराजू या नक्षलवादी चळवळीच्या म्होरक्यासह २७ माओवाद्यांना कंठस्नान घालून या लढाईतील यशाचा आणखी एक टप्पा सर केला. संघटनेच्या सरचिटणीसपदावरील वरिष्ठ पदाधिकाऱ्यालाच यमसदनास पाठवून सुरक्षा यंत्रणांनी गेल्या दहा वर्षांतील सर्वांत मोठी कामगिरी बजावली. 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' नावाच्या या जबरदस्त मोहिमेत तब्बल ५४ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली असून, ८४ नक्षलवाद्यांनी शस्त्रे ठेवून शरणागती पत्करल्याने, तीन राज्यांसमोरील नक्षली दहशतवादाचे आव्हान जवळजवळ संपुष्टात आले आहे. गेल्या दहा वर्षांत नक्षलग्रस्त जिल्ह्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर घट झाली. आठ हजारांहून अधिक नक्षलवादी हिंसेचा मार्ग त्यागून सामान्य जनजीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत. छत्तीसगडमधील बीजापूर, कांकेर, नारायणपूर आणि सुकमा हे चार जिल्हे, झारखंडमधील पश्चिम सिंघभूम, आणि महाराष्ट्रातील गडचिरोली या जिल्ह्यांतील नक्षली कारवायांना वेसण घालण्यात सुरक्षा यंत्रणांना संपूर्ण यश आले आहे. दोनच दिवसांपूर्वी, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड आणि छत्तीसगडच्या सीमावर्ती भागात सी-६० कमांडोंनी चार जहाल माओवाद्यांना कंठस्नान घातले. भामरागड तालुका आणि छत्तीसगडच्या सीमेवरील कवंडे गावात दोनच महिन्यांपूर्वी गडचिरोली पोलिसांनी सुरक्षा छावणी सुरू केली होती. याच परिसरात माओवाद्यांच्या हालचाली टिपल्या गेल्या आणि सी-६० पथकाच्या ३०० जवानांनी केंद्रीय राखीव पोलिसांच्या तुकडीसोबत कारवाई सुरू केली. माओवाद्यांच्या गोळीबाराची तमा न बाळगता आक्रमकपणे केलेल्या या कारवाईत चार माओवाद्यांचा खात्मा झाला.

२०१४ मध्ये देशातील ३३० पोलिस परिक्षेत्रे नक्षली कारवायांनी ग्रस्त होती. आता ही संख्या शंभरपर्यंत घटली आहे आणि १८ हजार चौरस किलोमीटरपर्यंत फैलावलेले नक्षली दहशतीचे सावट आता जेमतेम चार हजार चौरस किलोमीटरपर्यंत कमी झाले आहे. २००४ ते २०१४ या दहा वर्षांत नक्षली हिंसाचाराच्या १६ हजार ४६३ घटनांची नोंद झाली होती. पुढच्या दहा वर्षांत, सन २०१४ ते २०२४ या काळात या घटनांमध्ये तब्बल ५३ टक्के घट झाली. सुरक्षा दलांच्या जीवितहानीचे प्रमाणही ७३ टक्क्यांनी घटले. नक्षलवाद्यांची आर्थिक रसद तोडण्यासाठी गेल्या दहा वर्षांत राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि ईडीसारख्या संस्थांच्या मदतीने केल्या गेलेल्या कारवायांतून करोडो रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली, कायदेशीर कारवाया सुरू करण्यात आल्या आणि नक्षल्यांना पैसा पुरविणाऱ्यांची गजाआड रवानगी करण्यात आली. आता नक्षलग्रस्त भागांतील असुरक्षिततेची भावना दूर होत असून विकासाचे मार्ग दिसू लागले आहेत. विविध विकास प्रकल्पांच्या नियोजनाकरिता केली जाणारी तरतूद ३०० टक्क्यांनी वाढविली गेली आहे.

नक्षलवादाच्या विरोधातील या लढाईत केंद्र सरकार आणि सुरक्षा यंत्रणांनी प्राप्त केलेल्या यशाची इतिहासात नोंद होणार आहे. नक्षलवादाच्या अंधकारात बुडालेल्या अविकसित गावागावांत विकासाचे पर्व सुरू करून सामान्य नागरिकांना घटनात्मक अधिकारांचा निःसंकोच वापर करता येईल असा आत्मविश्वास रुजविण्याचे आव्हान केंद्र सरकारने स्वीकारले आहे. नक्षलवादाच्या हिंसक विचारांचे विष काढून त्या जागी विकास आणि विश्वासाचे बीज पेरण्याचा संकल्प केंद्र सरकारने सोडला आहे. नक्षलवादाच्या विरोधात शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारून आणि सरकारी योजनांची शंभर टक्के अंमलबजावणी करूनच नक्षलग्रस्त भागाच्या कपाळावरील असुरक्षिततेचा डाग पुसला जाईल याची केंद्र सरकारला खात्री आहे. त्यासाठी, नक्षलग्रस्त भागांत कायद्याचे राज्य स्थापित करणे, बेकायदेशीरपणे चालणाऱ्या कारवाया व हिंसाचार पूर्णपणे थांबविणे आणि नक्षली चळवळीमुळे विकासापासून वंचित राहिलेल्या भागाचे नुकसान तातडीने भरून काढणे हा यापुढे केंद्र सरकारचा प्राधान्याचा कार्यक्रम राहणार आहे. बुढा पहाड, चकरबंधा यांसारखे नक्षली कारवायांमुळे अतिसंवेदनशील ठरलेले भाग नक्षलवादाच्या विळख्यातून पूर्णपणे सुटले असून छत्तीसगडमधील नक्षलवादी गटांचे सामर्थ्य ८५ टक्क्यांनी खचले आहे.

आता नक्षलवादावर अंतिम वार करण्याची गरज आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये नवी दिल्ली येथील नक्षलवादविरोधी कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत स्पष्ट केले होते. येत्या वर्षभरात, ३१ मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त झालेला असेल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी या बैठकीनंतर देशाला दिली होती. नक्षलवाद हा केवळ आदिवासी भागातील विकासाचा शत्रू नाही, तर तो मानवतेचाच शत्रू आहे. विकासातील सर्वांत मोठा अडथळा असलेला आणि मानवी हक्कांची सर्वाधिक हानी करणारा हा विचार देशातून हद्दपार व्हायलाच हवा यावर सामूहिक एकमत आहे. आता तो विचार कृतिशील झाला आहे. देशातील आठ कोटी आदिवासी बांधवांना विकासापासून आणि मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवणे हेच मानवी हक्कांचे सर्वांत मोठे उल्लंघन आहे. देशाच्या सीमेपलीकडील शत्रूंकडून प्रशिक्षण घेऊन भारतात अस्थिरता आणि असुरक्षितता माजविणाऱ्या हिंसक दहशतवादाचे आव्हान जेवढे खडतर आहे, तेवढेच नक्षलवादाचा नायनाट करण्याचे आव्हानही खडतर आहे. केंद्र सरकारने त्यासाठी ताकद पणाला लावली आहे आणि नक्षलवादाच्या अस्ताचा आरंभ झाला आहे. ■

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

डॉ. जयंत नारळीकर यांचे स्मरण

मी नुकतीच संशोधनाला सुरुवात केली होती. मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेण्टल रिसर्चमध्ये (टीआयएफआर) लिटरेचर सर्व्हे करण्यासाठी गेलो होतो. लायब्ररीत माझ्या टेबलसमोर एक व्यक्ती तास, दीडतास पुस्तके, जर्नल्स वाचून निघून जायची. तेथील सर्व जण तिच्याकडे फार आदराने पाहायची. त्यामुळे ही कोणीतरी मोठी व्यक्ती आहे हे मला जाणवले. पण त्यांचे नाव माहीत नव्हते.

एकदा दूरदर्शनवर 'प्रतिभा आणि प्रतिमा' या कार्यक्रमात त्यांना बघितल्यावर कळले की ते विख्यात शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर आहेत. दुसऱ्या दिवशी मी भीतभीतच त्यांच्याशी बोललो. त्यांनी अतिशय आस्थेने माझी चौकशी केली. नंतर रोजच आमची भेट होत असे. एकदा त्यांनी विचारले की, टीआयएफआर पाहिले का? मी नाही म्हटल्यावर ते म्हणाले, उद्या आपण टीआयएफआर बघायला जाऊ.

दुसऱ्या दिवशी टीआयएफआरमधील विविध प्रयोगशाळांत मला नेऊन त्यांनी तिथल्या संशोधनाबद्दल सविस्तर समजावून सांगितले. जेवणाची वेळ झाल्यावर ते मला त्यांच्या घरी घेऊन गेले. जेवणाच्या टेबलावर त्यांचे वडील रँग्लर नारळीकर, भाऊ अनंत नारळीकर, जे त्यावेळी नॅशनल फिजिकल लॅबॉरेटरीचे (एनपीएल) उपसंचालक होते, पत्नी डॉ. मंगला नारळीकर इतकी ख्यातनाम मंडळी होती.

मी त्यांच्यासमोर अगदीच लहान. पण बोलताना त्यांनी मला इतके मोकळे केले की मी एक परका आहे हे जाणवलेच नाही. जेवण झाल्यावर पुन्हा उर्वरित प्रयोगशाळांना भेटी देऊन आम्ही लायब्ररीत परतलो. ते म्हणाले की, आता आपली भेट होणार नाही. मी परदेश दौऱ्यावर जातो आहे. जवळपास सहा वर्षे माझा त्यांच्याशी संपर्क नव्हता. त्यानंतर एकदा नागपूर विद्यापीठात डॉ. जयंत नारळीकरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी मी नागपूर विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागात प्राध्यापक होतो. आठवण ठेवून त्यांनी मला फोन करून कुलगुरूंच्या कक्षात बोलवून घेतले. मला म्हणाले की, तुझी प्रयोगशाळा दाखव. माझ्या स्कूटरवर बसून ते आमच्या भौतिकशास्त्र विभागात आले. जवळजवळ एक तासभर ते माझ्या प्रयोगशाळेत होते. माझा प्रबंध पाहिला. खूप प्रश्न विचारले. पुढील संशोधनासाठी मौलिक सूचना केल्या. नंतर माझ्या स्कूटरवर बसून त्यांच्या व्याख्यानाच्या ठिकाणी गेलो. पुण्याला गेल्यावर एखादवेळी त्यांची भेट व्हायची. पण गेल्या काही वर्षांपासून त्यांच्याशी संपर्क नव्हता. त्यांच्या दुःखद निधनाची बातमी कळल्यावर जुन्या आठवणी जाग्या झाल्या. डॉ. जयंत नारळीकर यांचं थोरपण त्यांच्या साधेपणात दडलेलं आहे असं जाणवतं. एका फार मोठ्या शास्त्रज्ञाला, लेखकाला देश मुकला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली..!

डॉ. अच्युत देशपांडे/९६३७०१९२५४

●● ●●

डोनाल्ड ट्रम्प यांचा उतावीळपणा

भारत आणि पाकिस्तानमधील संभावित अणुयुद्ध आपल्यामुळेच थांबले असे घूमजाव वक्तव्य पुन्हा एकदा करून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतःचेच हसे करून घेतले आहे. त्यांच्या वल्गनांना एका महासत्तेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून जेवढे गांभीर्याने घ्यावे तेवढे अलिकडे कुणी घेत नाहीत. कारण भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धविरामाची घोषणाही उतावीळपणे आधी त्यांनीच केली होती आणि हे सर्व आपल्या मध्यस्थीने झाले असे जाहीर करून त्याचे श्रेयही घेतले. पुढे ते एवढे सुसाट सुटले की, काश्मीरचा प्रश्न हा हजार वर्षांचा जुना वाद असून तोही सोडविण्यास आपण पुढाकार घेऊ म्हणत अकलेचे तारे तोडले. पण आपले परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी लगेच ट्रम्प यांचे गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या उतावळ्या नवऱ्यासारखे वारंवार केले जाणारे हे दावे कठोरपणे फेटाळून लावले. जयशंकर एवढ्यावरच थांबले नाहीत तर भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांवर त्यांच्या टिप्पण्यांचा काय परिणाम होईल याबद्दल प्रश्न उपस्थित केले. तेव्हा कुठे भानावर येत एका कार्यक्रमात भारत-पाक युद्ध थांबवण्यास आपण मध्यस्थी केली नसली तरी मदत मात्र नक्की केली असे म्हणत ट्रम्प यांनी घूमजाव केले. पण पुन्हा एकदा यूटर्न घेत भारत- पाक यांच्यात भडकू पाहणारे युद्ध आपणच थांबविल्याच्या फुशारक्या मारायला त्यांनी सुरुवात केली आहे. अर्थात युद्ध थांबविण्याचा सल्ला ट्रम्प यांनी दिलाच नाही असा दावा भारताने केलेला नाही. अमेरिकेसह इतर अनेक मित्रराष्ट्रांनी चर्चेतून मार्ग काढण्याची सूचना केली होती. अर्थात त्यात काही गैरही नाही. भारतही तसे सल्ले आपल्या मित्रराष्ट्रांना देत असतो. कारण विश्वाची शांती हेच भारताचे स्वप्न आहे. पण असे सल्ले देताना प्रमाणिकपणाचा जो सात्त्विक भाव हवा तो ट्रम्प यांच्यात नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे युद्ध कुण्या देशाविरुद्ध नसून दहशतवादी आणि त्यांचे आका हेच आपले लक्ष्यआहेत हे सर्वांना ठणकावून सांगितले. त्यानंतर नऊ दहशतवादी अड्डे आणि अकरा एअरबेस उद्ध्वस्त झाल्यावर डोके ठिकाणावर आलेल्या पाकच्या डीजीएमओने भारतीय डीजीएमओंना फोन केला आणि त्यानंतर शस्त्रसंधीवर बोलणी झाली. हे वास्तव ट्रम्प यांनाही माहीत आहे पण अवघ्या जगाचे तंटामुक्ती अध्यक्ष बनण्याची खुमखुमी त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

काही दिवसांपूर्वी अनेक देशांवर जशास तसे टेरिफ लावल्याची घोषणा करत ते म्हणाले, आज अमेरिकेचा मुक्ती दिवस आहे. या दिवसाची वाट अमेरिका अनेक काळापासून पाहात होती. चीन आणि अमेरिकेत तर हे टेरिफयुद्ध एवढे भडकले की अमेरिकेने १४५ टक्के एवढा विक्रमी टेरिफ चिनी वस्तूंवर लावला तर चीननेही १२५ टक्के टेरिफ आकारत तसेच उत्तर दिले. चीन व भारतासह अनेक देशांच्या नित्योपयोगी वस्तूवरील वाढलेल्या टेरिफमुळे अमेरिकन जनतेत महागाई विरुद्ध आक्रोश उसळण्याची चिन्हे दिसताच ट्रम्प यांच्या लहरीपणावर काहीसा लगाम बसला आणि टेरिफवर स्थगिती आणण्याची नामुष्की अमेरिकेवर आली. भारताने मात्र ट्रम्प यांच्या वारंवारच्या या आडमुठेपणास धोरणीपणाने आणि संयमाने उत्तरे दिली. कारण ट्रम्प यांची विधाने मुत्सद्दी व चिरस्थायी नसतात याची जाणीव भारतीय नेतृत्वाला आहे. मात्र ट्रम्प यांच्या वारंवारच्या उतावीळ घोषणाबाजीने आणि कोलांटउड्यांमुळे भारत आणि अमेरिकेच्या मैत्रीस सुरुंग लागू नये यासाठी भारताने सजग राहण्याची मात्र गरज आहे. भारतीय नेतृत्व त्यासाठी समर्थ आहे.

किशोर उरकुंडवार/९९२१२६३०६२

●● ●●

विद्यार्थी, पालक, शिक्षकांमध्ये शारीरिक साक्षरता आवश्यक

मला वाटते आज कालची मुले, तरुण आणि काही अंशी प्रौढ सुद्धा एका गोष्टीला गृहीत धरतात आणि ते म्हणजे त्यांना लाभलेलं आरोग्यदायी शरीर. त्यांना असं वाटतं की आपले किंवा आपल्या मुलांचे शरीर आहे तसेच काम करत राहील त्यासाठी वेगळं काही करण्याची गरज नाही. त्यामुळे अनेक जण झोपेची शिस्त, खाण्याच्या वेळापत्रकाची किंवा खाद्यपदार्थांची शिस्त किंवा व्यायामाची शिस्त या कुठल्याही गोष्टीकडे हवे तेवढे लक्ष देत नाहीत.

खरं म्हणजे आपल्याला लाभलेले शरीर ही निसर्गाने म्हणा, देवाने म्हणा दिलेली सगळ्यात मोठी भेट आहे. आपण ही भेट मिळायला काय करतोय - काहीच नाही. परंतु ज्याला जगातील सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी डिझाईन म्हटलं जातं असे शरीर आपल्याला मिळालेलं असतं. साधा डोळ्याचा पडदा बदलायचा असेल तर आज घडीला दोन एक लाख रुपये लागतात, मग बाकीच्या महत्त्वाच्या अवयवांच्या विषयी म्हणजे यकृत, मूत्रपिंड, हृदय, मेंदू यांच्याविषयी बोलायलाच नको.

या शरीराची जडणघडण वयाच्या अठरा वर्षापर्यंत होते आणि त्यानंतर त्याला थोडी उतरती कळा लागायला लागते. त्यामुळे लहान वयापासूनच जर आपण आपल्या शरीराची निगा राखली तर त्याचा आपल्याला आयुष्यभर फायदा होतो. आपल्याकडे योगासन, सूर्यनमस्कार, दंडबैठका असे अतिशय परिणामकारक व्यायाम काही खर्च न करता करता येऊ शकतात. अर्थात त्या जोडीला काहीतरी मनोरंजक खेळांची पण आवश्यकता असते. परंतु आपल्याकडील बहुतांशी शाळांमध्ये, काही शहरी किंवा आंतरराष्ट्रीय शाळा सोडल्यास, काहीच गोष्टी नसतात.

युनेस्कोने शारीरिक साक्षरता अशी एक नवीन संकल्पना प्रचलित केली ती केवळ शारीरिक क्रिया करण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. यात ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टिकोन समाविष्ट आहेत जे व्यक्तींना विविध वातावरणात क्षमता आणि आत्मविश्वासाने हालचाल करण्यास सक्षम करतात. त्याच्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे

शारीरिक क्षमता : विविध क्रियाकलापांसाठी आवश्यक मोटर कौशल्ये, समन्वय आणि सामर्थ्याचा विकास.

आत्मविश्वास आणि प्रेरणा : नियमितपणे शारीरिक क्रियाकलापांमध्ये भाग घेण्याची तयारी आणि आत्मविश्वास.

ज्ञान आणि समज : शारीरिक क्रियाकलापांचे फायदे आणि हालचाल कौशल्ये प्रभावीपणे कशी लागू करावी याबद्दल जागरूकता.

शारीरिक साक्षरतेमुळे मेंदूचे कार्य वाढवते, एकाग्रता, स्मरणशक्ती आणि समस्या सोडविण्याची कौशल्ये सुधारते. तसेच सामाजिक आणि भावनिक विकास होतो - क्रीडा आणि करमणुकीच्या क्रियाकलापांमध्ये गुंतल्याने टीमवर्क / सांघिक क्षमता, लवचीकता आणि स्वयंशिस्त वाढते. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये शारीरिक साक्षरता याविषयाची जाणीव करून दिली पाहिजे त्यासाठी वेगवेगळ्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय खेळांचा समावेश केला पाहिजे.

गुरुजी एज्युकेशन फाऊंडेशनमध्ये ग्रामीण भागातील होतकरू शाळांना वेगवेगळी साधने पुरवतो आणि त्याचा वापर योग्य होतो का नाही याकडे लक्ष देतो. याच्यामध्ये टेबल टेनिसच्या बॅट आणि बॉल याचा समावेश आहे. या बॅट आणि बॉल आपण फक्त टॅपिंग करायचं, उजव्या हाताने बॅक हॅण्ड, फ्रंट हॅण्ड, उजवा आणि डावा हात अदलाबदलीने, त्यामध्येही बॅक हॅण्ड, फ्रंट हॅण्ड असे अनेक प्रकार येतात. यामुळे हात आणि डोळे यामधील समन्वय आणि एकाग्रता वाढीस लागते. त्याचप्रमाणे आपल्याकडील व्यायाम जो जगभरामध्ये आता वापरला जातो ते म्हणजे दोरीवरच्या उड्या. तर त्याही आपण शाळांना देतो त्याच्याशिवाय फुटबॉल आणि वेगवेगळे कोन की त्याच्यामुळं मुलं डॉजिंग शिकू शकतील अशाही आपण गोष्टी देतो. मुलांसाठी शारीरिक साक्षरता हा केवळ विकासाचा एक पैलू झाला. त्याच्याशिवाय मानसिक बळ, बौद्धिक क्षमता, उद्योजकतेचा विकास आणि जीवन कौशल्य यांच्या पण विकासाची आवश्यकता आहे.

प्रदीप वायचाळ/९७३०४४८५६४

●● ●●

युवकांची वाढती व्यसनाधीनता चिंताजनक

आजचा युवक हा राष्ट्राचा कणा आहे, उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण, क्रीडा, साहित्य, कला अशा अनेक क्षेत्रांत युवकांनी आपला ठसा उमटवलेला आहे. परंतु याच युवकांमध्ये आज एक अतिशय धोकादायक आणि चिंतेचा विषय ठळकपणे समोर येतो आहे, तो म्हणजे वाढती व्यसनाधीनता. सिगारेट, दारू, तंबाखू, गुटखा, ड्रग्ज, मोबाईल, समाज माध्यम, पॉर्नोग्राफी, ओटीटीवरील अनावश्यक आणि चुकीची माहिती यांचा अतिवापर ही व्यसनांच्या नव्या स्वरूपांची यादी अधिकाधिक वाढवतो आहे. युवक वयाने तरुण, उमद्या रक्ताचे असले तरी त्यांच्यावर मानसिक, सामाजिक आणि भावनिक दडपणाचा मोठा प्रभाव असतो. हेच दडपण अनेकदा त्यांना व्यसनांकडे वळायला भाग पाडते. या व्यसनाधीनतेची सुरुवात फारशी गंभीर वाटत नाही. मित्रांच्या दबावातून, एकदा काय होतंय? अशा विचारातून किंवा फॅशन म्हणून अनेक युवक सिगारेट, मद्यपान, ड्रग्ज, अथवा तंबाखू, गुटख्याच्या सेवनाला सुरुवात करतात. काहीजण तर ऑनलाईन गेम्स, जुगार आणि सट्टा यात गुंततात. सुरुवातीला हे सर्व टाईमपास वाटते. पण जसजसे याचे सेवन नियमित होते, तसतसे ते मनावर, शरीरावर आणि व्यवहारावर ताबा मिळवू लागते. मग या युवकांना हे व्यसन सोडणे अवघडच नव्हे तर अशक्य वाटू लागते.

दुर्दैवाने, व्यसन केवळ वैयक्तिक हानी करत नाही, तर संपूर्ण कुटुंबाचे, समाजाचे आणि शेवटी राष्ट्राचे नुकसान करते. व्यसनाधीन युवक शारीरिकदृष्ट्या दुर्बल होतात. त्यांचे आरोग्य बिघडते, आजारांचे प्रमाण वाढते, शिक्षणात रस राहत नाही, कामात उत्साह उरत नाही आणि त्यांचा मानसिक तोलही ढासळतो. त्यातून चिडचिड, नैराश्य, आत्महत्येचे विचारही बळावू शकतात. त्यांचे नातेवाईक, पालक, मित

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

महावितरणच्या नाट्य स्पर्धेत 'केस नंबर ९९' प्रथम

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
महावितरणच्या वतीने लातूर येथे झालेल्या आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेत छत्रपती संभाजीनगर परिमंडळाच्या नाट्य संघाने सादर केलेल्या केस नंबर ९९ या नाटकाने बाजी मारत सर्वोत्तम पुरस्कारासह विविध वर्गवारीतील तीन प्रथम व दोन द्वितीय पुरस्कारही पटकावले आहेत.

लातूर परिमंडळाने सादर केलेल्या बेबी या नाटकाला वैयक्तीक प्रथम ४ तर ३ दुसऱ्या क्रमांकाची बक्षीसे घेत दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. येथील दगडोजीराव देशमुख नाट्यगृहात झालेल्या नाट्य स्पर्धेत लातूर परिमंडळासह नांदेड व छत्रपती संभाजीनगर परिमंडळाची नाटके सादर झाली. छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर, लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, प्रेमसिंग राजपूत यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

सूत्रसंचालन प्रमोद देशमूख व सुमती बिडवे यांनी केले. आभार उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर यांनी केले.

संक्षिप्त वृत्त...

आ. अमित देशमुख यांच्या हस्ते जगन्नाथ पाटील यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
आ.अमित देशमुख यांची लातूर जिल्हा मजूर संघाने शनिवारी बाभळगाव निवासस्थानी भेट घेतली.

या भेटीवेळी माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्हा मंजूर संघाच्या नूतन चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल जगन्नाथ पाटील यांचा सत्कार करीत नूतन संचालक मंडळाचेअभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संचालक सय्यद अशदुल्ला,गणेश एस.आर. देशमुख,सुरेश गायकवाड,बाबा पठाण,आनंद सूर्यवंशी,भास्कर पाटील,व्यंकट शिंदे आदीसह लातूर जिल्हा मजूर संघाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

आवाज कमी कर म्हटल्याने मारहाण

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
गाण्यांचा आवाज लहान कर म्हटल्याचा राग मनात धरून दोघा बाप-लेकांनी एकाला काठी व लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करून जखमी केल्याची घटना लातूरच्या संजय नगर भागात शनिवारी सकाळी १० वाजता घडली. याप्रकरणी दोघांविरोधात विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सकाळी १० वाजेच्या सुमारास संजय नगर येथील रहिवासी अमान मकसूद शेख हे घरात बसले होते. त्यावेळी शेजारी असलेला आरोपी रफीक शेख याने त्याच्या टेपचा मोठा आवाज केला होता. यामुळे अमान शेख यांना त्रास होत होता. अमान शेख यांनी टेपचा आवाज कमी करण्यास सांगितले. त्याचा राग अनावर झाल्याने आरोपी रफीक शेख व त्याचा मुलगा अमान यांच्या अंगावर धाऊन आले. रफीक याने काठीने अमान यांच्या हातावर मारून त्यांना जखमी केले. त्याचप्रमाणे दोघांनीही मिळून लाथा- बुक्क्यांनी शेख यांना बेदम मारहाण केली. याप्रकरणी अमान शेख यांच्या फिर्यादीवरून आरोपी रफीक शेख व त्याचा मुलगा यांच्याविरोधात गुरनं. भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात कॉन्स्टेबल दुड्डे करीत आहेत.

अर्धवट रस्त्यावर बसून केला महापालिकेचा निषेध

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
शहरातील बालाजी नगर-सारोळा-नांदेड रस्त्याचे काम गुत्तेदाराने अर्धवट अवस्थेत करून ठेवले आहे. मागील पंधरा दिवसांच्या पावसामुळे रस्त्यावर चिखल होत आहे. याचा वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर रस्ता तत्काळ पूर्ण करण्याच्या मागणीसाठी या भागातील नागरिकांनी रस्त्याच्या अर्धवट झालेल्या कामावर बसून महानगरपालिका प्रशासनाचा निषेध नोंदविला.

शहराच्या बालाजी नगर भागातील नागरिकांच्या मागणीवरून बालाजी नगर- सारोळा रस्त्यापर्यंतच्या रस्त्याला मंजुरी मिळाली. मागील दोन महिन्यांपासून या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. परंतु, मागील एक महिन्यापासून ते काम ठप्प आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाने या अर्धवट कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर चिखल होत आहे. त्यावरून वाहने घसरून लहान-मोठे अपघात होत आहेत. यामुळे अनेक वाहनधारकांना ईजा होत आहेत. सदर रस्ता तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी या भागातील नागरिकांतून होत आहे. शनिवारी या भागातील नागरिकांनी रस्त्याच्या अर्धवट कामावर बसून प्रशासन व गुत्तेदाराचा निषेध व्यक्त केला. विशेष म्हणजे यापूर्वीही नागरिकांच्यावतीने सदर रस्ता दुरुस्त करण्याची मागणी महापालिकेकडे केली होती. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यावर चिखल झाल्याने नागरिकांचे हाल सुरू आहेत. यावेळी राजा शुद्धोधन चॅरिटेबल ट्रस्टचे आनंद सोनवणे, गौतम सूर्यवंशी, सूर्यकांत दांडे, हेमंत जाधव, सचिन पारशी, इलहास पठाण, खादीरभाई, मुस्तफा, दगडू साळवे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

नारी शक्तीचा सन्मान एक ऊर्जावान स्त्रोत

डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
क्षमा, शौर्य, धर्म आणि नीतीच्या तत्त्वांचा समावेश असलेला हा पुरस्कार एक ऊर्जावान आहे. आपापल्या क्षेत्रात अमूल्य योगदान देऊन समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य करणाऱ्या नारी शक्तीचा हा विशेष सन्मान आहे. मूल्य, मातृत्त्वप्रेम आणि वारकरी संप्रदायाचे हे प्रतिक आहे. दूरदृष्टी ठेऊन विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांनी नारी शक्तीच्या गौरवासाठी सुरू केलेल्या या पुरस्काराला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व शास्त्रज्ञ डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी यांच्यावतीने लातूर तालुक्यातील रामेश्वर (रूई) येथे त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड यांच्या बाराव्या पुण्यस्मरण, स्मृतिदिनाचे औचित्य साधून पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

बडोदा संस्थानचे जितेंद्रसिंह गायकवाड हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड होते. आयुष्यभर समाजप्रबोधन व सांप्रदायिक सद्भावनेने सेवाभावी कार्य, समर्पित व निरपेक्ष भावनेने अव्याहतपणे करून, समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या बडोदा येथील बडोदा संस्थानच्या महाराणी आशाराजे गायकवाड, ज्येष्ठ समाजसेविका भारती ठाकूर, राजस्थान येथील ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ पीस अँड वेलबिईंगच्या राजयोगिनी डॉ. बिन्नी सरीन आणि बद्रिनाथ धाम येथील माणा गावाच्या शिक्षिका व समाजसेविका दमयंती जितवान आणि आळंदी येथील रमाबाई किसन महाराज साखरे या पंचकन्यांना पूर्णब्रह्मायोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, स्मृतिपदक व रोख १ लाख २५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप होते.

यावेळी बडोदा संस्थानचे जितेंद्रसिंहराजे गायकवाड आणि डॉ. भूषण पटवर्धन यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांचाही विशेष सत्कार ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने डॉ. बिन्नी सरीन यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास तुळशीराम कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम कराड, डॉ. हनुमंत कराड, डॉ. सुचित्रा नागरे, प्रा. स्वाती चाटे, पूनम कराड-नागरगोजे, डॉ. विश्वजीत नागरगोजे, कमल राजेखाँ पटेल, नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर, राजेश कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस. एन. पठाण यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, विश्वधर्मी मानवता तीर्थ म्हणून रामेश्वर गावची देशभर ओळख निर्माण झाली आहे. भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञानाचे मूर्तीमंत प्रतिक त्यागमूर्ती अक्का आहेत. ईश्वर ही व्यक्ती नाही तर शक्ती आहे. रामेश्वर येथे मानव एकतेचे मोठे प्रतिक निर्माण केले गेले आहे. अक्कांच्या नावाने दिला जाणाऱ्या या पुरस्कारातील पंचकन्यांचे कार्य महान आहे, असे ते म्हणाले. यावेळी अन्य मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली. प्रा. स्वाती कराड-चाटे स्वागतपर भाषणात म्हणाल्या, हा पुरस्कार एका कणखर दूरदृष्टी नेतृत्व असणाऱ्या अक्कांच्यामुळे आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे अध्यात्मिक होते. त्यांनी कराड घराण्याची जडण घडण केली आहे. डॉ. मिलिंद पात्रे यांनी सूत्रसंचालन केले.

लातूर जिल्हा माहिती कार्यालय राज्यात पहिले

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांच्या विशेष मोहीमेंतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या राज्यातील महाराष्ट्र राज्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक (माहिती) जिल्हास्तरावर लातूर जिल्हा माहिती कार्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांच्या विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत राज्याच्या सर्व महसुली विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

त्यात लातूर जिल्हा माहिती कार्यालय राज्यात पहिले आल्याबद्दल लातूर विभागीय माहिती कार्यालयाच्या संचालक डॉ. सुरेखा मुळे यांच्या उपस्थितीत लातूर जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांचा व कार्यालयातील जेष्ठ लिपीक विवेक डावरे, दिलीप वाठोरे, अहमद बेग, फोटोग्राफर अमोल घायाळ यांचा पत्रकार दत्तात्रय परळकर, पत्रकार रविकिरण सुर्यवंशी व पत्रकार संजीव पाटील यांच्या वतीने आज सत्कार करण्यात आला. यावेळी अनेकांनी उपस्थिती होती.

शंभर दिवसीय सुधारणा मोहिमेत लातूरचा डंका

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
महाराष्ट्र शासनाने शंभर दिवसीय कार्यालयीन कामकाज सुधारणा कार्यक्रम विशेष अभियानांतर्गत शासकीय कार्यालयात राबविलेल्या विविध लोकोपयोगी उपक्रमांची दखल घेत दुसऱ्या टप्प्यातील राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यालयांची घोषणा करण्यात आली आहे. त्यात लातूरचे प्रादेशिक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग प्रथम, प्रादेशिक परिवहन कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, सहआयुक्त पशुसंवर्धन, अधीक्षक जिल्हा कारागृह द्वितीय आले असून या विशेष अभियानात लातूरचा डंका वाजला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृध्दिंगत होणे, तक्रार निवारण, तंत्रज्ञानाचा वापर या उद्देशाने शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेण्यात आली होती.

कार्यालयात नागरिकांची कामे गतीने व्हावीत यासाठी उपक्रम हाती घेण्यात आला. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन तातडीने सोडवणूक करण्यात आली. यामुळे राज्यात लातूर 'आरटीओ' कार्यालय द्वितीय आले, असे 'आरटीओ' विनोद चव्हाण म्हणाले.

राहुल धनाश्री यांच्या निवडीचे स्वागत

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (मराठवाडा) कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित शक्ती सहकार छत्रपती संभाजीनगर संचालक मंडळाच्या निवडणुकीत उदगीर आगारातील राहुल धनाश्री यांची प्रचंड मतांनी निवड झाली आहे. निवडीबद्दल आगारातील कर्मचाऱ्यांनी गुलाल उधळून स्वागत केले.

पंचवार्षिक निवडणुकीत महाराष्ट्र एसटी संघटनेच्या पॅनलचा दणदणीत विजय झाला.

पॅनलचे सर्व सतरा उमेदवार विजयी झाले आहेत. पतसंस्थेत पारदर्शक कारभार करणार असून कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडवण्यास प्राधान्य देणार असल्याचे संचालक राहुल धनाश्री यांनी सांगितले. यावेळी माजी संचालक सुरेश कज्जेवाड, आगार सचिव मदन मोमले, नामदेव मुसने, विवेक बेळकुंदे, सी. एम बिरादार, गोविंद कुंभार, किशोर गायकवाड, अशोक धोंगडे, मनोज भंगावाड, गंगाधर जोंधळे आदींची उपस्थिती होती.

सततच्या पावसामुळे जीर्ण इमारती कोसळण्याचा धोका

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २५ मे -
मागील पंधरा दिवसांपासून लातूर शहरासह जिल्ह्यात अवकाळी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. अहोरात्र पाऊस होत असल्याने शहरातील सुमारे ९७ जीर्ण इमारती कोसळण्याचा धोका वाढला आहे. त्या इमारती महापालिका प्रशासन कधी पाडणार की, एखाद्या दुर्घटनेच्या प्रतिक्षेत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

लातूर शहरासह जिल्ह्यात मागील पंधरा दिवसांपासून अवकाळी पावसाने कहर केला आहे. दररोज रात्रभर हा पाऊस धो-धो कोसळत आहे. यामुळे अनेक घरांच्या भिंतींमध्ये पाणी भरले आहे.

त्याचप्रमाणे जमिनीही ओल्या झाल्याने दलदल निर्माण झाली आहे. शहरातील ९७ इमारती १०० वर्षांपूर्वीच्या असल्याचा निष्कर्ष महापालिकेच्या सर्वेक्षणात निघाला आहे. त्यामध्ये गावभागातील व गंजगोलाई परिसरातील इमारतींचा समावेश आहे. या इमारती वर्दळीच्या ठिकाणी दिमाखात उभ्या आहेत. विशेष म्हणजे मागील दहा वर्षांपूर्वी पाडण्यास सांगितलेल्या इमारतींमध्ये आजही व्यवसाय सुरू असल्याचे दिसून येते. या इमारती कधी कोसळून कोणाचा जीव घेतील, हे सांगता येत नाही. अशातच मागील १५ दिवसांपासून लातूर शहरासह जिल्ह्यात अवकाळी पावसाने अक्षरशः थैमान घातले आहे. दिवसभर कडक ऊन व सायंकाळी पाचनंतर सुरू झालेला अवकाळी पाऊस रात्रभर धो-धो कोसळत आहे.

यामुळे जमिनी पूर्णपणे ओल्या दलदलयुक्त झाल्या आहेत. त्याचप्रमाणे नव्या इमारतींच्या बांधकामांमध्येही पाणी गेल्याने त्यांना पाझर फुटले आहेत.

विशेष म्हणजे शंभर वर्षांपूर्वी बांधलेल्या इमारती या मातीच्या आहेत. त्यांचे कडे कोसळले आहेत. मध्येच कधीही कडे कोसळत आहेत. मागील दोन महिन्यापूर्वीच गोलाईच्या घंटे लॉजच्या इमारतीचा कडा कोसळला होता. त्याखाली दबून एका रिक्षासह दोन मोटारसायकलींचा चुराडा झाला होता.

त्यानंतर मागील दोन दिवसांपूर्वीच शहराच्या कापडलाईन भागातील एका जीर्ण इमारतीचा काही भाग कोसळला होता. या सर्व इमारती शहराच्या वर्दळीच्या ठिकाणी असल्याने त्यापासून धोका निर्माण झाला आहे.

राज्याच्या इतिहासात लोकहिताचे निर्णय घेणारे लोकनेते; विलासरावजी देशमुख

राज्यात व देशात स्वतः च्या कार्यावर ओळख करून देणारे लोकनेते म्हणून आजही राज्यात देशात विलासराव देशमुख यांची ओळख कायम राहिलेली आहे. राज्यात आठ वर्ष मुख्यमंत्री पद भोगणारे विलासराव देशमुख हे कायम लोकांच्या हिताचे निर्णय घेणारे लोकमान्य लोकनेते अशी ओळख राज्याच्या कानाकोपऱ्यात आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी त्यांच्या काळात भरीव योगदान देत लोकांच्या मनात कायम आदरातिथ्य असणारे हसतमुख लोकनेते विलासराव जी यांची आज २६ मे रोजी त्यांची ८० वी जयंती. त्या निमित्ताने त्यांना विनम्र आदरांजली.

विकासाचा पहिला घास लातूरला राज्यात जे नव ते लातूरला हवं असं विलासराव देशमुख यांचे नेहमी वाक्य असायचे. ते शब्दाला बांधील राहायचे, एक विकसनशील नेतृत्व म्हणून राज्याच्या कानाकोपऱ्यातून एकही जिल्हा नाही तिथं विलासराव देशमुख यांच्या हस्ते विकासांच काम झाले नाही.प्रत्येक व्यक्तींना मदत करत आपल्या लातूरच्या लोकांना तर सहजपणे उपलब्ध राहायचे. कोण कुठल्या राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते असतील त्यांनाही मदत करायचे.हे सगळ करत असताना राज्यात कुठलाही निधी असेल किंवा नवीन योजना सुरू केली असेल तर लागलीच लातूरला द्या असं रोखठोक बोलणारे, शब्दाला बांधील असणारे लोकमान्य नेते विलासराव देशमुख होते.त्यांच्या कार्याचे कितीही आपण लिहीत बसलो तरी ते संपणार नाही. राज्यात नावलौकिक असलेल्या मोजक्या मुख्यमंत्रीपदाच्या यादीत विकासाभिमुख नेतृत्व म्हणून विलासराव जी यांचे नाव आजही राज्यात घेतले जाते .लातूरला विकासाचा वेग प्रचंड मोठा वाढवत मराठवाड्यात विकासभिमुख शहर म्हणून लातूरची ओळख राज्यभर विलासराव साहेब यांच्या मुळे झाली. आजही लातूर म्हटले की विलासराव देशमुख यांचे लातूर अशी ओळख राहिलेली आहे. मराठवाड्यातील विभागीय कार्यालय लातूरला आणण्याचे काम यांच्याच कार्यकाळात झाले. विशेषतः विभागीय शिक्षण बोर्ड, विभागीय कृषि अधिकारी,सिंचन, विद्युत मंडळ, शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय ही त्यांचीच देणं आहे.

दुष्काळ भाग ते विकासाच्या नव्या वाटेवर एकेकाळी म राठवाड्यात दुष्काळी भाग म्हणून लातूर जिल्ह्याकडे लोक बघायचे.मात्र १९९ सालापासून लातूरच्या विकासाची चळवळ सुरू झाली.विलासराव देशमुख राज्याचे मुख्यमंत्री झाले,त्यानंतर विकासाचा वेग प्रचंड मोठा झाला. रस्ते,सिंचन प्रकल्प सुरू झाले,वेगवेगळ्या योजना राबवून लातूरच्या विकासाला चालना मिळाली. विलासरावजी यांनी पुढच्या ५० वर्षाचे लातूर व्हिजन कसे असावे यावर विकासाचा प्लॅन तयार करून लातूर शहरात उड्डाण पुल बांधला, जिल्ह्यातील मुख्य सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणून लोकांना चांगली सेवा कशी मिळेल अशी बऱ्याच गोष्टी त्यांनी केल्या. त्यामुळे आज आपल्याला शासकीय सुविधा उपलब्ध होत आहेत. त्याचे सर्व श्रेय विलासराव देशमुख यांच्या कडे जाते हे निर्विवाद सत्य आहे. एकेकाळी मराठवाड्यात दुष्काळी भाग म्हणून लातूरची ओळख होती ती पुसून काढण्याचे काम साहेब यांनी केले. आज लातूर म्हटले की सर्वांगीण विकास असलेले, शांत शहर, शिक्षण ,व्यापार, उद्योग इंडस्ट्रीज असलेले शहर म्हणून लातूरची ओळख राज्यभर राहिलेली आहे.

राज्यात सहकार चळवळीला बळ राज्याचे मुख्यमंत्री म्हणून विलासराव देशमुख यांनी पदभार घेतला तेव्हा सहकार चळवळ कोलमडून पडले काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती.मात्र विलासराव देशमुख यांनी राज्यातील सहकार तत्वावर चालवल्या जाणाऱ्या सूतगिरणी साखर उद्योग,जिल्हा बँका याकडे जास्त लक्ष देत सर्व संस्थांना पक्षविरहित मदत केली. संस्था टिकल्या पाहिजेत, त्या शिवाय ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक सुबत्ता मिळणार नाही हे त्यांना सगळ माहीत होते. त्यामुळे सहकार चळवळ अधिक मजबूत करण्याचे काम विलासराव जी यांनी केले. त्यामुळे आज राज्यात सहकार चळवळीला योगदान देणारे व बंद पडलेले साखर उद्योग, सूतगिरण्या असतील त्यांचे पुनर्जीवन केले.आज अनेक ठिकाणी साखर उद्योग, सहकारी सूतगिरण्या व्यवस्थित सुरू आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोकांना आर्थिक सुबत्ता आली, रोजगार मिळाला, व्यापार वाढला ते साहेब यांच्या कुशल निर्णयाने.

जिल्ह्यातील सहकार चळवळ वाढवली राज्यात सर्वांना मदत करीत असताना लातूर जिल्ह्याला झुकते माप देण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केले. ४० वर्षापूर्वी लोकनेते विलासराव देशमुख यांनी मांजरा साखर कारखाना उभा केला. पुढे सहकारात हळूहळू पकड बसल्याने त्यांनी रेणा, मारुती म हाराज साखर कारखाने उभे केले. त्यांच्याच नेतृत्वाखाली याच परिवारातील संस्थांचे १० साखर कारखाने उभे राहिले आहेत.

नुसते उभे राहिलेले नसून आज शेतकऱ्यांचे मंदिरे झालेली आहेत.याचे सर्व श्रेय विलासराव जी यांना जाते.,त्यांच्या पश्चात दिलीपराव देशमुख यांनी या परिवारातील साखर कारखाने अतिशय सूक्ष्म नियोजन, पारदर्शकता ठेवून लोकांच्या विश्वासाला पात्र ठरली आहेत. राज्यात आज सहकार क्षेत्र म्हटले की लातूरचा नावलौकिक असा उल्लेख होतोय.

त्यामागे विलासराव देशमुख यांच्या कार्याची आठवण, त्यांनी केलेले कार्य, लोकांच्या सेवेसाठी तत्पर सेवेत राहणारे विलासराव देशमुख कायम आठवणीचे लोकमान्य, लोकांचें लोकनेते म्हणून जीवन जगले.आज त्यांच्या कार्यामुळे राज्यात विलासराव देशमुख यांच्यावर प्रेम करणारा लाखो चाहता वर्ग आहे. लोकनेते देशमुख यांची आज ८० वी जयंती.त्यानिमित्ताने त्यांच्या स्मृतीस विनम्र आदरांजली.

-हरीराम कुलकर्णी
जेष्ठ पत्रकार लातूर

'शंखनाद' सभेची तयारी पूर्ण

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२५ मे-

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या 'शंखनाद' सभेसाठी भारतीय जनता पक्षाची तयारी पूर्ण झाली असून, जिल्ह्यात सर्वत्र प्रचंड उत्साहाचे वातावरण दिसून येते आहे. जिल्ह्यातील सर्वच नेते सभेसाठी जोरदार तयारीला लागले आहेत, तर ही सभा भव्य करण्याचा चंग कार्यकर्त्यांनी बांधला आहे.

केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांच्यासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे कार्याध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण आदी प्रमुख नेतेमंडळी सुद्धा नांदेड शहरात येणार असल्याने या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे रविवारी नांदेड शहरात डेरेदाखल झाले असून, दुपारी त्यांनी खा. अशोकराव चव्हाण यांच्यासमवेत सभास्थळासह दौऱ्यातील इतर कार्यक्रम स्थळांची पाहणी केली. याप्रसंगी खा.डॉ. अजित गोपछडे, संघटन मंत्री संजय कौडगे,नांदेड महानगर भाजपचे अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, किशोर स्वामी, चैतन्यबापू देशमुख, प्रवीण साले,रामराव केंद्रे,बालाजी जाधव,व्यंकटेश साठे आदी उपस्थित होते. पाहणी झाल्यानंतर प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना खा. अशोकराव चव्हाण यांनी सभेची तयारी पूर्ण झाल्याचे सांगितले, तर या सभेमुळे जिल्ह्यातील भाजपाची परिस्थिती अधिक मजबूत होणार असल्याचा विश्वास पालकमंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला.

हवामान बदलाचा विविध घटकांवर परीणाम

तभा वृतसेवा
किनवट, दि.२५ मे-

सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढलेली असतानाच किनवट शहरात रविवारी मध्यरात्री हवामानाने अनपेक्षित वळण घेतले. रात्रीच्या सुमारास आकाशात विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस झाला. सुमारे एक तास चाललेल्या या वादळी पावसामुळे नागरिकांची झोपमोड झाली, तसेच विजेचा पुरवठा खंडित झाल्याने अनेक ठिकाणी अंधाराचे साम्राज्य पसरले. विजांचा कडकडाट इतका तीव्र होता की, कुठेतरी विज कोसळल्यासारखा मोठा आवाज झाला. या अचानक बदललेल्या हवामानामुळे किनवट व परिसरातील विविध घटकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. विशेषतः शेतकऱ्यांपुढे खरीप हंगामाच्या पूर्वतयारीत अडथळे निर्माण झाले आहेत. उन्हाळ्यात शेतमाल साठवण्यासाठी केलेल्या व्यवस्था पावसामुळे धोक्यात आल्या असून, अनेकांची उन्हाळी पिके भिजून गेल्याने नुकसान झाले आहे.

उद्योगधंद्यांवरही परिणाम: शहरात उन्हाळ्याच्या उष्णतेपासून सुटका मिळवण्यासाठी थंड पेये, आईस्क्रीम, सरबत व फळांचे स्टॉल लावले गेले होते. मात्र, या अचानक आलेल्या वादळी पावसामुळे दुकानदारांचे मोठे नुकसान झाले. ऐन गर्दीच्या काळात झालेला पाऊस हा विक्रीला मारक ठरला आहे. सांस्कृतिक व विकासकामांवरही परिणाम: उन्हाळ्याच्या सुट्टीत विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेले मेळे, मीना बाजार, मनोरंजन पार्क यांना देखील पावसाचा फटका बसला. उघड्यावर लावलेले साहित्य भिजल्याने आयोजकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच शहरात व परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांवरही या पावसाचा मोठा परिणाम झाला आहे. पैनगंगा नदीवर उभारण्यात येणाऱ्या दोन उच्च पातळी बंधाऱ्यांचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, या पावसामुळे कामात व्यत्यय निर्माण झाला असून, बांधकामासाठी केलेल्या तात्पुरत्या व्यवस्था पाण्यात वाहून गेल्या किंवा खराब झाल्याने त्या पुन्हा पूर्ववत कराव्या लागणार आहेत.

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण: रात्रीच्या सुमारास विजांचा कडकडाट आणि अचानक आलेल्या वादळी पावसामुळे नागरिकांमध्ये काहीसा घबराटीचा माहोल निर्माण झाला. विजेचा लपंडाव आणि गडगडाटी वातावरणामुळे अनेक नागरिक झोपेतून उठून घराबाहेर पडले. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांमध्ये विदर्भात अशाच प्रकारच्या अनपेक्षित पावसाच्या घटना घडू शकतात. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. किनवट परिसरात रविवारी मध्यरात्री आलेल्या मुसळधार पावसामुळे शेती, उद्योग, व्यापार, विकासकामे आणि सामाजिक उपक्रम यांना मोठा फटका बसला आहे. हवामानातील या अनपेक्षित बदलांमुळे नागरिकांसह प्रशासनालाही सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

संक्षिप्त वृत्त

पत्रकार संजय सूर्यवंशी यांना धमकी देणाऱ्या आ. बाबुराव कदम यांच्यावर कारवाई करा

हदगाव - तू माझ्या विरोधात बातमी छापतोस का ? तुला संपून टाकतो अशी भाषा वापरत जीवे मारण्याची तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक देशोन्नतीचे पत्रकार संजय सूर्यवंशी यांना हदगाव - हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आ.बाबुराव कदम यांनी दिली असून त्यांच्यावर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाकडून जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे. निवघा- तळणी सर्कलमधील पंचवीस गावे २५ तासापासून अंधारात महावितरण चे अधिकारी नॉट रिचेबल या मथळ्याखाली बातमी छापून त्या बातमीत गुडघ्यापर्यंत दस्ती घालणारे नेते आहेत तरी कुठे असा कोट प्रकाशित केला होता. वास्तविक पाहता या बातमीत आ. बाबुराव कदम यांच्या नावाचा अथवा भगव्या दस्तीचा असा कुठलाही उल्लेख सदरील पत्रकाराने केलेल्या दिसत नाही तरीसुद्धा आमदार कोहळीकर यांना ही बातमी का झोंबली असे सवाल या निमित्ताने उपस्थित होत असून त्यांनी चक्क फोन लावून संजय सूर्यवंशी यांना अश्लील भाषेत जीवे मारण्याची धमकी दिली याप्रकरणी त्यांच्या विरोधात कायदेशीर गुन्हा दाखल करावा व पत्रकार संजय सूर्यवंशी यांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भाच्या अनुषंगाने शहरातील नामांकित पत्रकार व जिल्हाभरातील विविध वृत्तपत्राचे पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.आमदारांनी केलेल्या या कृत्याचा जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी निषेध व्यक्त केला अशीच परिस्थिती राहिली तर पत्रकारांनी वृत्तांकन करायचे कसे असे सवाल या निमित्ताने जिल्ह्याभरातील पत्रकारांनी उपस्थित केला. यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे प्रकाश कांबळे ,विजय जोशी, चारुदत्त चौधरी, प्रदीप नागापूरकर, गोवर्धन बियाणी ,पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे, प्रल्हाद लोहेकर ,लक्ष्मण भवरे ,राम तरटे यांच्यासह जिल्हाभरातील मोठ्या प्रमाणात पत्रकार बांधव उपस्थित होते.

पत्रकार सूर्यवंशी यांना संरक्षण देण्यात यावे- पांडागळे.

संजय सूर्यवंशी व त्यांचा परिवार आमदार बाबुराव कदम यांच्या धमकीने घाबरून गेला आहे दहशतीत आपले जीवन जगत आहेत आमदार बाबूराव कदम यांच्या कार्यकर्त्यांकडून पत्रकार संजय सूर्यवंशी यांना धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे जिल्हा पोलीस प्रशासनाने पत्रकार संजय सूर्यवंशी यांना पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्याकडे केली आहे.

श्री साईबाबा मंदिर कौठा वर्धापन दिनानिमित्त आजपासून श्रीमद् भागवत कथेस प्रारंभ

नांदेड -येथील श्री साईबाबा मंदिर, कौठाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त आज दि. २५ मे २०२५ पासून श्रीमद् भागवत कथा प्रारंभ होत असून यावेळी दुपारी २ ते ५ यावेळेत भागवताचार्य ह.भ.प. मनोहर महाराज आळंदीकर यांच्या अमृतवाणीतून भाविकांना कथा श्रवणाचा लाभ मिळणार आहे. तसेच १ जून २०२५ रोजी कथेच्या सांगता सोहळ्यात सकाळी १० ते १२ ह.भ.प. यशोधन महाराज साखरे आळंदी देवाची यांचे काल्याचे किर्तन होणार असून तद्नंतर महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त नित्य सायंकाळी ८ ते १० या वेळेत हरिकिर्तन आयोजित करण्यात आले आहे. भाविकांनी दर्शनाचा, श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळ श्री साईबाबा मंदिर व गौशाळा, कौठा नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचा दौरा

नांदेड -राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर २६ मे २०२५ रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. सोमवार २६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वा. परभणी येथून नांदेडकडे प्रयाण. दुपारी १.३० वा. माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या पुतळ्याचे अनावरण सोहळ्यास उपस्थित. दुपारी. १.४५ वा. खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या कार्यालयाचे उदघाटन कार्यक्रमास उपस्थिती. ठिकाण भाग्यनगर रोड नांदेड . दुपारी २ वा. केंद्रीय गृह व सहकार मंत्री ना. अमितभाई शाह यांच्या शंखनाद जाहीर सभेस उपस्थिती. दुपारी ४.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे राखीव. सायं. ६ वा. भाजप महानगर कार्यालयाचे उदघाटनास उपस्थिती. ठिकाण नाना-नानी पार्कसमोर नांदेड . सायं. ७.३० वा. आनंद निलमय, शिवाजी नगर नांदेड येथे राखीव. सोईनुसार नयनस्वप्न निवास, जुना पेडगाव रोड परभणी कडे प्रयाण करतील.

मुदखेड शहरामध्ये तिरंगा रॅलीस प्रतिसाद

तभा वृतसेवा
मुदखेड, दि.२५ मे-

आपल्या भारताच्या सैन्यदलाने पाकिस्तानचे कंबरडे मोडून ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या पार पाडणाऱ्या भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२३ मे रोजी मुदखेड शहरामध्ये तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर मध्ये शौर्य दाखवत पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली. या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण देशाची मान अभिमानाने उंचावली आहे.

आपल्या वीर जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि त्यांच्या पराक्रमाला सलाम करण्यासाठी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर तिरंगा रॅली गणपती मंदिर मोंढा येथुन निघाली आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी सर्व शहिदांना श्रद्धांजली अर्पण करून राष्ट्रगीताने या तिरंगा रॅलीचे समारोप करण्यात आले.

या रॅलीत सर्व केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान, माजी सैनिक,राजकीय पक्षांचे पदाधिकारी, जेष्ठ नागरिक, युवक-युवती, देशप्रेमी नागरिक आणि राष्ट्रभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वीर जवानांचे मनोधैर्य उंचावण्याचा प्रयत्न केला.

नांदेड, दि.२५ मे-

शेतकऱ्यांनी Google Play Store da Mahavistar AI असे शोधून हे प डाऊनलोड करावे व त्यामधील विविध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली व कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे यांनी केले आहे.

या ॲपमध्ये शेतकऱ्यांसाठी सविस्तर माहिती व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

काँग्रेसच्या वतीने २८ रोजी 'जय जवान जय किसान' तिरंगा रॅली

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२५ मे-

माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या 'जय जवान जय किसान' जयघोषाच्या निनाद करत दिनांक २८ मे रोजी शहरात तिरंगा रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती खासदार रवींद्र चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

काँग्रेस पक्षाच्या वतीने दिनांक २८ मे रोजी तिरंगा रॅली काढण्याचे सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु नांदेड जिल्हा कमिटीने वेळ वाढवून घेत दिनांक २८ रोजी तिरंगा रॅली काढण्याचे नियोजन केले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात ही तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे.

लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान जय किसान' या जयघोषाच्या अनुषंगाने सीमेवरील जवानांचे मनोबल वाढावे तसेच शेतकऱ्यांचे प्रश्नासाठी ही तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. दि. २८ मे रोजी सकाळी ११ वाजता काँग्रेस कार्यालयातून या रॅलीची सुरुवात होणार असून जिल्हाधिकारी कार्यालयावर समारोप होणार असल्याचे खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हणमंत पाटील, माजी महापौर अब्दुल सत्तार, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, एकनाथ मोरे, विठ्ठल पावडे, मुन्तजीब, आनंद गुंडले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

स्थानिक निवडणुकांसाठी देशपातळीवरील नेत्यांना निमंत्रण

तिरंगा रॅली काढण्यासाठी काँग्रेसकडे जिल्ह्यात नेतृत्व नसल्याचे भाजपाकडून सांगण्यात येत आहे. परंतु नांदेड जिल्ह्यातील सर्वेसर्वा म्हणून खा. अशोक चव्हाण यांची ओळख असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा शंखनाद करण्यासाठी भाजपाने देशपातळीच्या नेत्यांना निमंत्रण दिले असून खासदार अशोक चव्हाण यांचे जिल्ह्यात वजन राहीले नाही काय ? असा प्रश्न उपस्थित करत मागच्या वेळी गृहमंत्री अमित शहा आले होते त्यावेळी देखील वातावरण खराब होते तर आताही वातावरण खराब असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसचा झेंडा फडकेल असा विश्वास खासदार रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

माहूर शहरात किसान ब्रिगेड च्या वतीने कर्जमुक्ती अर्ज भरण्याचा आज दुसरा टप्पा : अविनाश टनमनें

तभा वृतसेवा
माहुर, दि.२५ मे-

सरकार स्थापन झाल्यानंतर काही दिवसांत याबाबत निर्णय होईल, अशी राज्यातील शेतकऱ्यांना अपेक्षा होती.पण तसं झालं नाही. आणि म्हणूनच शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती सारख्या अत्यंत ज्वलंत मागणीला पाठिंबा देऊन किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष लोकनेते प्रकाश पोहरे यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले असून,किसान ब्रिगेडच्या वतीने शेतकरी कर्जमुक्तीचे अर्ज भरण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

त्यानुसार माहूर तालुका किसान ब्रिगेडच्या वतीने या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात आज सोमवार दिनांक २६ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत शहरातील नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या समोर तालुक्यातील उर्वरीत सर्व शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती अर्ज भरून घेण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी आधार कार्ड, सातबारा,शेत सर्वे नंबर क्षेत्र, मोबाईल नंबर हि सर्व कागदपत्रे घेऊन वेळेत हजर राहावे, असे आवाहन किसान ब्रिगेडचे नांदेड जिल्हा संघटक अविनाश टनमने यांनी केले आहे.

किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष लोकनेते प्रकाश पोहरे यांनी शासनास कर्ज माफी देण्यास भाग पाडू वेळ पडल्यास कोर्टात जनहीत याचीका दाखल करु असे रणशिंग फुंकले आहे. प्रत्येक शेतकऱ्याचा अर्ज पोहोचविण्यासाठी प्रकाश पोहरे यांच्या नेतृत्वात पुरुषोत्तम गावंडे किसान ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनात माहूर शहरात मध्यवर्ती नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक समोर सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत तालुका किसान ब्रिगेडच्या वतीने तालुक्यातील उर्वरित सर्व शेतकऱ्यांचे अर्ज भरून घेतल्या जाणार असून, याकरिता शेतकरी बांधवांनी वेळेत उपस्थित रहावे असे आवहन अविनाश टनमने, आगाखान पठाण, संदीप टनमने, प्रविण मार्कड,रतन जेठेवाड, प्रशांत गंदे, सतिष चौधरी, संतोष हिंगाडे, प्रवीण गावंडे, निकेतन कुंटे, सुधाकर निलेवाड, शंकर राठोड अन्य शेतकरी बांधव उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती कि.ब्रि.जिल्हा संघटक अविनाश टनमने यांनी केले आहे.

अर्धवट ड्रेनेज लाईनचे काम पुर्ण करण्याची मागणी

तभा वृतसेवा
भोकर, दि.२५ मे-

शहरातील वसरणी येथील गट क्र २९/२ व २७/२ गटामध्ये ड्रेनेज लाईनचे काम शारदा कंन्ट्रक्शन यांचेमार्फत चालू असतांना माधव खराणे व आनंदा वाघमारे यांनी त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र नसतांनाही सदरची रिकामी जागा त्यांच्या मालकीचे असल्याचे सांगुन ड्रेनेजच्या लाईनचे कामकाज थांबविण्यात आले असुन हे अर्धवट काम पुर्ण करावे अशी मागणी वसरणी येथील नागरीकांनी केली आहे.

गट क्र. २७/२ मध्ये ज्याठिकाणी ड्रेनेज लाईनच्या पाण्याचा विसर्ग नैसर्गिकरित्या होतो त्या दिशेने ड्रेनेजची लाईन न टाकता, अंदाजे ११ फुट खोल ड्रेनेजची लाईन टाकून विर्सगाच्या विरुध्द दिशेने लाईन अर्धवट लाईन टाकण्यात आली आहे. उर्वरित लाईन पाण्याचा विसर्ग मिळत नाही म्हणुन अर्धवट सोडण्यात आली आहे. याबाबत शारदा कंन्ट्रशनचे क्षेत्रिय अधिकारी जगदीश पाटील यांनी शारदा कंन्ट्रक्शन कंपनीची परवानगी विचारणा न करता परस्पर परवानगी घेवुन अर्धवट ड्रेनेजची लाईन टाकली असल्याचे सांगीतले. त्यातच पुर्ण लाईन न टाकता अर्धवट ड्रेनेज लाईन टाकली आहे. अर्धवट लाईन टाकण्यास पालिकेच्या कोणत्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिली हा प्रश्न उपस्थित झाला आहे. उर्वरित अंदाजे ३५० मिटर लाईन विनाकारण त्रास देण्याच्या उददेशाने टाकण्यात आलेली नाही असे निदर्शनास येत आहे. तर याबाबत अभियंता सरपाते यांना वारंवार भेटून माहिती विचारली असता त्यांनी कोणतीही समाधानकारक माहिती देत नसुन गट क्र. २७/२ व बाजुबाजुच्या इतर गटामध्ये ज्याठिकाणी घर किंवा कोणीही राहण्यास नाही त्याठिकाणी ड्रेनेजची लाईन टाकण्यात आली आहे. परंतू गट क्र २७/२ मध्ये सध्या वास्तव्यास असलेल्या रहिवाशांच्या घरासमोर ड्रेनेज लाईन टाकण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. या विषयी वारंवार निवेदन देवुनही टाळाटाळ होत अुसुन तातडीने ड्रेनेज लाईनचे काम करावे अशी मागणी वसरणी येथील नागरीकांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे. निवेदनावर शोभाबाई खंगळे, अंकिता जोंधळे, माधुार निर्मले, सयाबाई वाघमारे,भाग्यश्री तारु, कमलाबाई तारु, शितल खरे, उमेश जोंधळे, कावेरी मोहारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

भोकर तालूक्यात वृक्षतोड;वनविभागाचे दूर्लक्ष

तभा वृतसेवा
भोकर, दि.२५ मे-

तालूक्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत असून याकडे संबधित विभागाचे दूर्लक्ष होत आहे.

वनाचे रक्षण करणे हे वनविभागाचे कर्तव्य असताना मोठ्या प्रमाणात सागवान सह अन्य झाडांची तोड होत आहे याकडे संबधित विभागाचे जाणीवपूर्वक दूर्लक्ष होत आहे.भोकर शहरात दिडशेहून अधिक फर्निचरची दूकाने थाटलेली आहेत जंगलातील झाडांची तोड दिवसाढवळ्या करित असल्याचे निदर्शनास येते कांहि गावात लाकूड कटई मशीन असल्याचेही बोलले जाते सदर गावातूनच वृक्षाची तोड करुन भोकर येथे फर्निचर व्यवसायीकांना विक्रि करित असल्याची चर्चा आहे. हिंगोली परभणी लातूर हून ग्राहक भोकर येथे येवून फर्निचरचे साहित्य बनवून घेत असल्याचेही स्थानिक ग्राहक बोलून दाखवत आहेत वनविभागाला याची कल्पना असून देखील याकडे संबधित यंत्रणेचे साफ दूर्लक्ष होत आहे.वनसंपदा जोपासण्याचे काम वनविभाचे असताना संबधित विभागाने कानाडोळा करित असल्याने भरदिवसा वृक्ष तोड होत असल्याचे निदर्शनास येत आहे.शहरातील फर्निचर व्यापारी बनवलेले फर्निचर साहित्य रस्त्यावरच ठेवून त्यावर लायकर पॉलीश मारत असल्याने रस्त्याने ये जा करणाऱ्या सामान्य नागरीकांना त्रास होत आहे. आरोग्यास घातक असलेले लायकर पॉलीश नांदेड रोड लगत नागरीकांची मोठ्या प्रमाणात ये जा असलेल्या ठिकाणीच याचा वापर होत असल्याने नाहक त्रास नागरीकांना सोसावा लागतो वनविभागाने होत असलेल्या वृक्ष तोडीकडे व शहरातील फर्निचर व्यवसायीकांना कडक सूचना देवून रस्त्यावर फर्निचरचे साहित्य ठेवून लायकर पॉलीशचे काम करणारे व्यवसायीकांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शहरातील सूज्ञ नागरीक करित आहेत.

चव्हाण,मंगनाळे नंतर पोटपल्लेवारही वशिलेबाजीने प्रभारी कृषी अधिकारी !

तभा वृतसेवा
लोहा, दि.२५ मे-

तालुका कृषी कार्यालय म्हणजे वशिलेबाजीचे कार्यालय म्हणुन शेतकऱ्यांत ओळख झाली आहे. पुर्वी वशिलेबाजीने रहात्या घराजवळच शासकिय नौकरी उपलब्ध होत होती पण शासनाने प्रत्येक विभागात पारदर्शकता आसावी म्हणुन वशिलेबाजील मुठमाती दिली. शासनस्थरावरुन ऑनलाइन बदली प्रक्रियेला सुरुवात झाली. परंतु लोहा कृषी कार्यालयात आजही वशिलेबाजी सुरु असुन माणिक चव्हाण, विश्वंभर मंगनाळे यांच्याप्रमाणेच सदानंद पोटपल्लेवारही वशिलेबाजीने कृषी अधिकारी ठरले आहेत.

शेतकऱ्याची हेळसांड होऊ नये असे असा दम आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी श्रीनिवास मंगल कार्यालयात पेरणी पुर्व आढावा बैठकीत देत शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्याचे आदेश दिले आहेत . परंतु लोहा कृषी विभागात गेली अनेक वर्षे प्रभारी अधिकारी राज आसल्याने या विभागात मोठी मरगळ आली आहे. प्रभारी अधिकारी नांदेड लोहा अप- डाऊनच्या दौऱ्यावर असतात. कृषी कार्यालय म्हणजे मेंढपाळाचे ठिकाण झाल्याचे दिसुन येते. या कार्यालयाच्या ठिकाणी कोणतीच शेतकऱ्यांसाठी सुविधा नाहीत अनेक वेळा कार्यालय चालू असताना कार्यालयासमोर मेंढपाळ, जनावरे चारताना दिसून येतात. कर्मचारी कधी उपस्थित असल्याचे दिसून येत नाही पण चार पाच मेंढपाळ व जनावरे चारवणारे गुराखी नेहमी दिसून येतात. कर्माचारी शेतकऱ्यांच्या शेती बांधावर मार्गदर्शन करतान कधीच दिसत नाहीत. कार्यालयात प्रभारी अधिकारी कधीच उपस्थित राहात नाही तर कर्मचारी कुठून उपस्थित राहातील अशी अवस्था प्रभारी कृर्षी कार्यालयाची झाली आहे.

शासकीय योजनां कधी येते की, कधी बंद होते की, याचा शेतकऱ्यान थांगपत्ता लागत नाही. शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांना जास्त फायदा मिळून देण्यात प्रभारी कृषी अधिकारी कृतीशिल आसल्याचे दिसुन येते. माती परीक्षण उपाययोजना केल्या जात नाहीत. बियाणे उगवले किंवा पिकांना फळधारणा झाली याची कधीच कार्यालयाकडून पाहाणी केली जात नाही. प्रभारी अधिकारी आले तेव्हापासुन तालुक्यात नेहमीच ऐन पेरणीच्या मोसमात खत टंचाई निर्माण होते. यापुढे कृर्षी कार्यालयात सुधारणा व्हावी अन्यथा कार्यवाही करण्यास मागेपुढे बघणार नाही असा इशारा आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिला. तसेच शेतकऱ्यांची हेळसांड होणार नाही तर शेतकऱ्यांची हेळसांड खपुन घेतले जाणार नाही असे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आढावा बैठकीत सांगीतले. परंतु कृषी अधिकारी या इशाऱ्याला गांभीर्याने घेणार कि नाही हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

खा. डॉ . गोपछडे यांचे जनसंपर्क कार्यालयाचा आज अमित शहा यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२५ मे-

जनसेवेसाठी सदैव तत्पर असणारे राज्यसभा खा.डॉ. अजित गोपछडे यांचे अंत्योदय जनसंपर्क कार्यालयाचा सोहळा उद्या दिनांक २६ मे रोजी दुपारी तीन वाजता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आणि राजाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. आयोजित अंत्योदय जनसंपर्क कार्यालय सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन खा. डॉ .अजित गोपछडे यांच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यात आले आहे.

वर्कशॉप ते आनंदनगर रोडवरील नूतन वास्तूत खा. डॉ . अजित गोपछडे यांच्या अंत्योदय जनसंपर्क कार्यालय लोकसेवेसाठी तयार करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन आणि खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या एक वर्षाच्या कार्य अहवालाचा प्रकाशन सोहळा पार पडणार आहे . खासदार डॉक्टर अजित गोपछडे यांच्या अंत्योदय या जनसंपर्क कार्यालयात पहिल्या माळावर राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी , जनतेचे अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी, विविध शासकीय कार्यालयात लागणाऱ्या कागदपत्रांच्या देवाण-घेवाणीसाठी विशेष कक्ष असणार आहेत. दुसऱ्या माळ्यावर भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था , या ठिकाणी विविध बैठका , पत्रकार परिषदा घेण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे तर तिसऱ्या माळ्यावर इलेक्ट्रॉनिक मीडिया , प्रिंट मीडिया , सोशल मीडिया यांच्यासाठी व्यवस्था करण्यात आलेली असून याच ठिकाणी भोजन कक्षाची ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. अत्याधुनिक सोयी सुविधांसह उभारण्यात आलेल्या अंत्योदय जनसंपर्क कार्यालयाच्या सोहळ्यासाठी उद्घाटक म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांची उपस्थिती राहणार आहेत तर कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे असणार आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विशेष उपस्थिती राहणार असून यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण , नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे , माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण , मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे , आ. भीमराव केराम , आ. डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार , आ. जितेश अंतापूरकर, आ. श्रीजया चव्हाण यांचीही यावेळी उपस्थित राहणार आहे. आयोजित अंत्योदय जनसंपर्क कार्यालय सोहळ्यास भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी , कार्यकर्ते आणि जनतेने उपस्थित राहावे असे आवाहन खा. डॉ. अजित गोपछडे, माजी आमदार तथा भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजुरकर , जिल्हाध्यक्ष डॉ . संतुकराव हंबर्डे , जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांनी केले आहे.

जनतेला घरपोच शासकीय योजनांचा लाभ मिळावा- भालेराव

अंजनवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २५ मे

जनतेला घरपोच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत असून याचा फायदा जनतेने घ्यावा असे आवाहन नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांनी केले.

औंढा नागनाथ तालुक्यातील अंजनवाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात २३ मे रोजी शुक्रवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. प्रथमत: सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाराजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव व दिपप्रज्वलन सरपंच यशोदाबाई घोंगडे यांनी केले. अंजनवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर कार्यक्रमात विविध विभागाचे स्टॉल व बॅनर्स लावण्यात आले होते. निवडणुक विभाग, पुरवठा विभाग, संगायो विभाग, विविध प्रकारचे प्रमाणपत्र, संकिर्ण विभाग अंतर्गत उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, शिधापत्रिका ,वय व अधिवास प्रमाणपत्र तसेच पंचायत समितीचे घरकुल विभाग, विहिर लाभार्थी याना कार्यरंभ आदेश,कृषी विभागाचे लाभार्थी तसेच ग्रा.पं.चे वतीने काही लाभार्थ्यांना जन्म-मृत्यु दाखले प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच विविध प्रमाणपत्र लाभार्थ्यांना वाटप निवडणूक नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव,सरपंच यशोदाबाई घोंगडे, नायब तहसीलदार अनिता कोलगणी पुरवठा निरीक्षण अधिकारी हेमा खाडे, सामाजिक कार्यकर्ते किरण घोंगडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांना सर्व विभागातील अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास निवडणूक नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, नायब तहसीलदार आनिता कोलगणे, पुरवठा निरीक्षण अधिकारी हेमा खाडे, अंजनवाडा सरपंच यशोदाबाई घोंगडे उपसरपंच उत्तमराव चव्हाण, मंडळ अधिकारी रंगनाथ मेहत्रे, महसूल अधिकारी मयुरी बंबाडे, ग्राम विकास अधिकारी भाऊसाहेब भुजबळ,पशुसंवर्धन अधिकारी डॉ.आदिनाथ पारवेकर, कृषी विभागाचे विजय संघई, डॉ. रघुनाथ बेंगाळ, शेख हमीद, श्रीकृष्ण दराडे, इमरान पठाण, संगीता बामनपल्ले, नितीश कुलकर्णी, विनोद घोडके, आनंद दातार, उदय उपवार, मुकीद पठाण, पोलीस पाटील, विनायक काचगुंडे, ग्रामरोजगार सेवक सटवाजी गारोळे, तालुकाध्यक्ष हरीश पोले, देवराव चव्हाण, अतुल पायघन, नागेश दिपके, मधुसूदन काचगुंडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

पोलिस अधिकारी, अंमलदार यांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

नैसर्गिक आपत्तीसाठी पोलिस दल सज्ज

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २५ मे

पुरपरिस्थिती, वादळ व इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी पोलिस विभागातील अधिकारी व अंमलदार यांना आपत्ती व्यवस्थापनाच्यावतीने प्रशिक्षण देण्यात आले. पोलिस दल आता कोणत्याही नैसर्गिक आपत्तीसाठी सज्ज झाले आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी पावसाळ्याच्या दिवसांमध्ये पूरपरिस्थित, वादळ व इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीला सक्षमपणे तोंड देवून नागरिकांच्या जीवीताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथक नगर पालिकेच्यावतीने पोलिस दलातील अधिकारी व अंमलदार यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक औंढा नागनाथ येथील तलावामध्ये घेण्यात आले. सदर प्रात्यक्षिकामध्ये पूरात अडकलेल्या व्यक्तींना सुरक्षित बाहेर काढणे, वादळामुळे रस्त्यावर पडलेली झाडै बाजूला करणे, कटर मशीन चालविणे, बोट चालविणे, प्रथमोपचार असे विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.

सदर प्रशिक्षण हिंगोली जिल्हा पोलिस दलाचे अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, उपनि मगन पवार, राखीव दलाचे पोलिस निरीक्षक जाधव यांच्यासह अधिकारी व अंमलदार यांना देण्यात आले. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीसाठी हिंगोली पोलिस दल सज्ज असल्याचे पोलिस विभागाच्या सुत्रांनी सांगितले.

मारहाण प्रकरणी शिरड शहापूर येथे आदिवासी बांधवांचा रास्तारोको

तभा वृत्तसेवा
शिरड शहापूर, २५ मे

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथेआदिवासी व्यक्तीला केलेल्या मारहाणीच्या निषेधार्थ दुपारी १२ ते जवळपास एक तास औंढा-वसमत राज्य रस्त्यावर आदिवासी समाजातर्फे रास्ता रोको करण्यात आला.

शिरड शहापूर येथील कृषी केंद्रावर आनंदराव मारोती मोरे या आदिवासी व्यक्तीला हळद शिजविण्याच्या मजुरीच्या पैशाच्या कारणावरून मारहाण करण्यात आली होती त्यानुसार दिलीप बोंगाणे, कपिल बोंगाणे व इतर दोन व्यक्तीवर २३ मे रोजी संध्याकाळी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेच्या निषेध म्हणून दि २४ मे रोजी आदिवासी समाजातर्फे शिरड शहापूर येथील बसस्थानकावर औंढा वसमत राज्य रस्त्यावर जवळपास एक तास रास्ता रोको करण्यात आला. पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात मौजे काठोडा चोंडी तालुका औंढा येथील आनंदराव मोरे यांना शिरड शहापूर येथे चार इसमानी लाथा बुक्क्या, बेल्ट व लोखंडी रोडने जबर मारहाण केली तसेच मारहाण करून त्याला जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. मजुराने मारहाण करणाऱ्या इसमाकडे हळद शिजवण्याच्या कामाच्या मजुरीचे पैसे मागितले होते. या कारणावरून आरोपींनी मी तुझे पैसे देत नाही असे सांगून जातिवाचक शिवीगाळ करून जबर मारहाण केली. त्यामुळे वरील घटनेची गांभीर्याने दखल घेऊन आरोपी विरुद्ध ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल करावा. अटक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. रास्ता रोको आंदोलनात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव सामील झाले होते. यावेळेस रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनाच्या रांगात रांगा लागल्या होत्या. यावेळेस पोलीस प्रशासनाने चौक बंदोबस्त ठेवला होता.

हिंगोली- हिंगोली ते औंढा नागनाथ रस्त्यावरी कयाधू नदीच्या पूलावरील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून या खड्डयात पाणी साचत असल्यामुळे वाहन चालकांना वाहने जीव मुठीत धरून चालवावे लागत आहेत. मागील अनेक वर्षापासून हा रस्ता धोकादायक बनला आहे. हा रस्ता जीवघेणा बनला असून तत्काळ दुरूस्तीचे मागणी नागरिक करीत आहेत. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

शिक्षक अभियोग्यता चाचणीचे आयोजन

हिंगोली- राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरतीसाठी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेचे आयोजन दि. २४ मे ते ५ जून, २०२५ पर्यंत प्रविष्ठ उमेदवारांच्या संख्येनुसार व उपलब्ध भौतिक सुविधेनुसार बदल झाल्यास परिषदेच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल, असे दि. २५ एप्रिल, २०२५ च्या अधिसूचनेद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ परीक्षा घेण्याचे नियोजन दि. २७ ते ३० मे, २०२५ आणि दि. २ ते ५ जून, २०२५ या कालावधीत करण्यात आलेले आहे. या परीक्षेचे प्रवेशपत्र लवकरच उमेदवारांना देण्यात येतील. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत वेळोवेळी दिलेल्या, प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या तसेच परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेतील सूचनांचे उमेदवारांनी काटेकोर पालन करावे, असे आवाहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

औंढ्यात भाजपच्यावतीने स्वच्छता अभियान

हिंगोली- औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ मंदिरामध्ये अवकाळी पावसामुळे पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले होते. भाजपा औंढा शहर शाखेच्यावतीने भाजपा शहराध्यक्ष बबन सोनुने यांच्या नेतृत्वात आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ मंदिर, बारव, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर या परिसराची साफसफाई केली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष बबन सोनुने, नवनाथ देशमुख, राजू गिरी, महेश जोशी, मंगेश गुरव, नागनाथ लाड, बाळू देशमुख, दिलीप गायकवाड, विष्णू डवले, संदीप गायकवाड, नरेश क्षीरसागर, विजय ठाकूर, रामप्रसाद उदगिरे यांची उपस्थिती होती.

कयाधू नदीवरील रस्ता बनला जीवघेणा

हिंगोली- हिंगोली ते औंढा नागनाथकडे जाणारा कयाधू नदीवरील पूल आणि रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे हा रस्ता जीवघेणा बनला आहे. मागील दोन दिवसांपासून शहरात पावसाचे आगमन झाले आहे. या पावसाचे पाणी पूलावरील रस्त्यावरील खड्डयात साचल्यामुळे वाहन चालकांना जीव मुठीत धरून वाहने चालवावी लागत आहे. या मार्गावर चोवीस तास वाहतुक असते. पूलावरील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यापूर्वी पूलावरील रस्ता दुरूस्त करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

मुख्य बाजारपेठेत वाहतुकीस अडथळा करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २५ मे

शहरातील गांधी चौक, महावीर चौक तसेच मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या फळविक्रेत्यासह हातगाडे चालक व फुटकळ व्यापारी यांच्यावर पोलिस विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली. त्यामुळे गांधी चौकातील वाहतुक सुरळीत झाली आहे.

येथील मुख्य बाजारपेठेतील गांधी चौक, जवाहर रोड, इंदिरा गांधी चौक, महावीर चौक आदी भागात रस्त्यावर हातगाडे तसेच काही फळविक्रेते रस्त्यावर बसून विक्री करीत असल्यामुळे या भागात वाहतुकीची कोंडी होत असून सामान्य नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात वारंवार नागरिकांकडून तक्रारी होत असल्याने शहर पोलिस ठाणे, वाहतुक शाखेच्यावतीने दि २४ मे रोजी रस्त्यावर हातगाडे तसेच फळविक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली तसेच यापुढे वाहतुकीस अडथळा निर्माण केल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी दिला आहे. गांधी चौकात अनेकवेळा पोलिसांकडून कारवाई करण्यात येते परंतु काही दिवसांनी पुन्हा वाहतुकीची कोंडी होते. फळविक्रेत्यांना कायमस्वरूपी जागा देऊन प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी सामान्य नागरिकांमधून होत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त धनगर समाजाची बैठक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २५ मे

औंढा नागनाथ शहरातील शासकीय विश्रामगृह याठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने धनगर समाज बांधवांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत जयंती उत्सव समिती सर्वानुमते तयार करण्यात आली. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष हरीश पोले, उपाध्यक्ष गजानन सातपुते, सचिव सुरेश कुंडगीर, कोषाध्यक्ष नंदकुमार रवंदळे यांची निवड करून बैठकीत सत्कार करण्यात आला. औंढा नागनाथ शहरातील नागनाथ मंदिराच्या पश्चिम दिशेला पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर पूर्णाकृती पुतळ्यास तीन जूनला सकाळी सात वाजता दुग्धभिषेक करण्यात येणार असून दुपारी एक वाजता शहरामधून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीस जास्तीत जास्त संख्येने धनगर समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आव्हान देखील सकल धनगर समाजाच्या बैठकीमध्ये करण्यात आले आहे. या बैठकीत मा.विश्वस्त डॉ. विलास खरात, प्रा. साहेबराव देवकते, सर्जेराव दिंडे, लखन शिंदे, उमेश पोले, सुरेश कुंडगिर, गंगाधर पोले, नितीन पोले, बालासाहेब पोले, बंडू पोले, किरण पोले, श्रीमंत गडदे, दत्ता पोले, सुनील पोले, संतोष उफाड ,सुरेश पोले, गोपाल बिरगड, राम पोले, ओम पोले, राहुल पोले, गजानन सातपुते यांच्यासह औंढा तालुक्यातील सकल धनगर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. प्रस्तावना लखन शिंदे सूत्रसंचालन डॉ. विलास खरात तर आभार नितीन पोले यांनी मानले.

जिल्ह्यात विकसित कृषी संकल्प अभियानाचे आयोजन

तभा वृत्त सेवा
हिंगोली, २५ मे

भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली आणि कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर यांच्यामार्फत वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ मे ते दि. १२ जून या कालावधीत जिल्ह्यातील कळमनुरी, हिंगोली, औंढा नागनाथ आणि सेनगाव या चार तालुक्यांतील ९० गावांमध्ये विकसित कृषि संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश खरीप हंगामाची पूर्वतयारी, शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेणे आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

या अभियानात भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली आणि केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था, नागपूर येथील शास्त्रज्ञांची टीम सहभागी होणार आहे. यामध्ये डॉ. ए. तिरुग्नानवेल, डॉ. सुरजित मुंडल, डॉ. किरणकुमार कोम्मू आणि डॉ. दर्शन कदम यांचा समावेश आहे. तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील डॉ. आर. डी. भालेराव व डॉ. एस. एच. सारंग (सहाय्यक प्राध्यापक, कृषि महाविद्यालय, गोळेगाव), कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ आणि कृषि विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिरात किसान रथ गावांमध्ये फिरणार असून, त्याद्वारे शेतकऱ्यांना विविध नवीन तंत्रज्ञान, विविध पिकांच्या सुधारित जाती, नवीन कृषि अवजारे, माती नमुना घेण्याची योग्य पद्धत, सुधारित पीक, भाजीपाला आणि फळ लागवड तंत्रज्ञान, कुक्कुटपालन, शेळीपालन, तसेच विविध पिकांचे एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याविषयी माहिती दिली जाणार आहे. तसेच विविध विषयांवरील माहिती पुस्तिका (घडीपत्रिका) देखील शेतकऱ्यांना वितरित केल्या जाणार आहेत.

या विकसित कृषि संकल्प अभियानच्या उद्घाटन कार्यक्रमाला माजी खासदार ड. शिवाजीराव माने यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधी निमंत्रित असतील.

या अभियानादरम्यान ग्रामपंचायत, गाव, शाळा मुख्य रस्त्यांची स्वच्छता आणि सजावट करावी. घरासमोर आणि सार्वजनिक ठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढाव्यात. गावातील प्रवेशद्वारावर आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांचे तोरण आणि पताका लावाव्यात. गावातील लोकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून संस्कृतीचे दर्शन घडवावे. स्वागत कार्यक्रमात शाळेतील मुलांचे छोटे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

शेतकरी, महिला बचत गट आणि युवकांसाठी स्वतंत्र बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. बैठकीत खरीप हंगामातील पिकांची निवड व नियोजन, बीबियाणे, खते व इतर कृषी निविष्ठांची उपलब्धता, पाणी व्यवस्थापन व सिंचन, पीक संरक्षण व रोग व्यवस्थापन, कृषी कर्ज व शासकीय योजना, शेतीमालाची विक्री व्यवस्था यावर चर्चा करण्यात येणार आहे.

गावातील शेती पद्धती, सध्याच्या समस्या आणि गरजांसंबंधीची माहिती देण्यात येणार आहे. माहितीमध्ये गावातील एकूण शेती क्षेत्र व पिकांची माहिती, सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती, खते व बियाण्यांचा वापर, पिकांवरील रोग व किडींची समस्या आणि शासकीय योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांची संख्या यांचा समावेश असेल. महिला बचत गटांच्या कार्याविषयी आणि गावातील युवकांची संख्या व कृषि क्षेत्रातील त्यांची भूमिका याबद्दल माहिती देण्यात येईल.

मराठा, धनगर, बहुजन वाद वाढावा ही देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल
समस्त बहुजन समाजाने सावध राहावे - डॉ. संजय लाखेपाटील

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी आणि गुणरत्न सदावर्ते यांचा बोलवता, कर्ता, करविता धनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असून साक्षात मुघल सम्राट औरंगजेबाला शक्य झाले नाही ते घडवण्याचा हा बालिश प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप करत मराठा, धनगर, बहुजन वाद वाढावा ही देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल असून समस्त बहुजन समाजाने सावध राहावे असे आवाहन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे. या संदर्भात बोलतांना डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले की, या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ पातशाह...म्हाटा पातशाह एवढा छत्रपती जाहला, ही गोष्ट सामान्य झाली नाही.. असे ज्याचे तत्कालीन सर्वदेशी इतिहासकारांनी वर्णन केले आणि ज्या घटनेने मृतप्राय तमाम हिंदू समाजात अक्षरशः नवचैतन्य संचारले अशी शेकडो वर्षातून घडलेलूली शिवराज्याभिषेक ही एकमेवाद्वितीय ऐतिहासिक जिवंत घटना असून ०६ जून हा नेमानेच साजरा होणारा भारतवर्षातील एक सर्वोच्च आनंद सोहळा असून त्या पासून करोडो लोक, पिढ्यान्-पिढ्या लढावू वृत्ती, अचूक नियोजन, स्वातंत्र्य, स्वराज्य, रयतेचे राज्य आणि स्वाभिमान यांची प्रेरणा घेतात आणि हा सोहळा तिथी, तारीख अश्या वादात न पडता दररोज ही साजरा करण्यास व हृदयाच्या देव्हाऱ्यात पुजण्यासाठी सज्ज असतात. तोच राज्यभिषेक सोहळा सहेतुक तिथी आणि तारखेच्या वादात ओढून आपल्या हुकूमी आणि पाळीव गुलाम अनुयायांना हाताशी धरून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुहेतुपुर्वक राज्यात मराठा धनगर बहुजन हा जातिय - धार्मिक वाद तेवत ठेवण्यासाठी प्रयत्नशिल आहेत आणि म्हणूनच युगप्रवर्तक युगपुरूष शिवशककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक शिवराज्याभिषेकचा तारीख आणि तिथी असा वाद उकरून काढण्याचे षडयंत्र संभाजी भिडे मार्फत आखून आणि त्यात पुन्हा अनैतिहासिक वाघ्या कुत्र्याचा तडका द्यायला लावून जातिय धार्मिक वाद निर्माण करून विशेषतः महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचे षडयंत्र रचत असल्याचा अतिशय गंभीर आरोप शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला आहे. मुघल बादशहा औरंगझेबाचा सरदार मिर्झा राजे जयसिंग यांचा विजय व्हावा म्हणून होमहवन यज्ञ करणाऱ्यांच्या जातकुळीचा वारस शिवद्रोही संभाजी भिडेचे, शिवराज्याभिषेक सोहळा कायमचा नामशेष करा हे गुन्हेगारी स्वरूपाचे वक्तव्य पाहून गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना यात काहीच दखलपात्र वाटत नाही का? साक्षात छत्रपती शिवाजी महाराज आणि

संभाजी भिडे आणि सदावर्तेचा बोलवता धनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुघल सम्राट औरंगजेबाला शक्य झाले नाही ते घडवण्याचा बालिश प्रयत्न

पवित्र आणि पिढ्यानपिढ्या प्रेरणादायी शिवराज्याभिषेक सोहळा कायमचा नामशेष करा असे म्हणून संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी याने अतिशय गंभीर गुन्हा केला गेला आहे असे फडणवीस यांना गृहमंत्री म्हणून वाटत नाही का? शिवराज्याभिषेक कायमचा नामशेष करा या भिडे यांच्या नालायकी वक्तव्यामुळे शिवभक्त म्हणून श्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वतःच्या भावनेला ठेच पोहोचली नाही का? मग स्वतः फडणवीस आणि त्यांचे गृहखाते इतकं बेसुध का आहे? की या गुन्हेगारी कृत्याची स्वतः होऊन दखलच घेत नाही? भिडे विरोधात कुणीतरी तक्रार करावी आणि आपण भिडे च्या डोक्यावर हात ठेवून अश्या विकृत प्रवृत्तीचे समर्थक गोंजारावेत यांची फडणवीस वाट पाहात आहेत का? असा रोकडा सवाल डॉ. संजय लाखेपाटील यांनी विचारला आहे. गेल्या काही दिवसांपूव पिसाळलेले कुत्रे चावल्यानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी प्रगट होऊन संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी याने काल पिसाळलेल्या कुत्र्यागतच ठरवून दिलेली वक्तव्य भुंकली आहेत आणि संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातील तमाम सर्वधमय शिवप्रेमी दरवष प्रमाणे ६ जूनच्या शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळ्याची तयारीत मग्न असतांनाच (आणि काही तिथी प्रमाणे आजही साजरा करतातच) त्याने पिसाळल्यागत वक्तव्ये करून सुसंस्कृत शिवप्रेमींच्या मनाचे आणि भावनेचे लचके तोडण्याचा आणि त्यांना भडकावण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला आहे आणि ६ जूनचा शिवछत्रपती राज्याभिषेक कायमचा नष्ट झाला पाहिजे; कायमस्वरूपी बंद केला पाहिजे.! अशी अतिशय भडकावू वक्तव्ये केली आहेत आणि आज पुढील क्रम ठरवून दिल्यागत गुणरत्न सदावर्ते आदी त्यात सामिल झालेले दिसून येत आहेत! संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी यांच्या काल आणि मागच्या काही दिवसांतील भेटी गाठी बघता आणि या संपूर्ण घटनाक्रमाची क्रोनोलॉजी समजून घेता भिडे व सदावर्ते आदी जे पिसाळलेले धाडस करताहेत त्यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची फुस आहे. हे लक्षात येते! आणि म्हणूनच गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस किंवा त्यांचे हुकमी गृहखाते गप्पगार आहे. यामागे एकीकडे शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळ्याला तिथी, तारखेचा वाद निर्माण करायचा तर दुसरीकडे त्यास अनैतिहासिक वाघ्या कुत्र्याचा तडका देऊन स्वतः जातिवंत इतिहासकार असल्यागत तो काढूच नका असे असंदभय म्हणत येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर धनगर मराठा बहुजन हा सामाजिक वाद वाढवायचा अशी ही कुटील चाल असून त्या पाठीमागे अनाजीपंत फडणवीस यांच्या शिवाय दुसरा कुठलाही विचित्र मेंदू असूच शकत नाही कारण हे दोघेही फडणवीस यांची पाळीव असंस्कृत जनावरे आहेत हे उभ्या महाराष्ट्राला अतिशय चांगले अवगत आहे. आणि येत्या काही दिवसांत संभाजी भिडे आदींच्या वक्तव्याने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती बिघडली तर त्याची जबाबदारी ही निश्चितच फडणवीस आणि गृहखात्याची असेल हे नक्की. कदाचित सुदैवाने या संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी यांच्या पाठीमागे गृहमंत्री असलेल्या श्री देवेंद्र फडणवीस यांचा हात नसेलच त्यांची फुस नसेल आणि नाही तर, साक्षात शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळा कायमस्वरूपी नामशेष करावा.! असे जाहीर सामाजिक धार्मिक स्फोटक व्यक्तव्य करणारा संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी आणि हा वाद वाढवणारा आणि राज्यातील शिवप्रेमीच्या भावनेशी खेळणारे गुणरत्न सदावर्ते आदीवर राज्यसरकारने व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः होऊन कठोरात कठोर गुन्हे दाखल करण्याचे आदेश तातडीने देऊन तसे गुन्हे दाखल करावेत आणि आपण सराईत शिवद्रोह्यांच्या बाजूने नाही हे कृतीतून सिद्ध करावे असेही आवाहन डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे. येत्या ३१ मे रोजीच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्म जयंती कार्यक्रमाला गालबोट लागावे आणि त्यातून मराठा धनगर बहुजन हा वाद वाढावा या अतिशय कुटील खेळतील ही एक देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल आहे. हे ओळखून समस्त बहुजन समाजाने सावध राहावे असे आवाहन ही डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

सिमेंट कंपनीकडून बांधकाम कॉन्ट्रॅक्टर सय्यद अहमदनूर यांना विमा स्वरूपात मदत

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी बांधकाम कॉन्ट्रॅक्टर सय्यद अहमद नूर यांना साईट वर काम करत असताना अँगल ग्रेंडिंग मशीन त्यांच्या अंगावर पडले. त्यामध्ये त्यांना हातावर २७ तर पायाला ३७ टाके पडले. या घटनेची माहिती जाफराबाद येथील अंबुजा कंपनीचे अधिकृत डीलर अनंता बर्वे (गोपाल हार्डवेअर) यांनी कंपनीचे टेक्निकल इंजिनीयर पवन कोल्हे आणि टेक्निकल सर्व्हिसेस इंजिनीयर प्रतीक मालपाणी यांना दिली. त्यांनी तत्काळ या गोष्टीची दखल घेत त्यांना तत्काळ मदतीचे आश्वासन दिले. तसेच अंबुजा रिवार्ड कनेक्ट या प्रोग्राम अंतर्गत कॉन्ट्रॅक्टर सय्यद अहमद नूर यांना छत्तीस हजार सहाशे चाळीस (३६,६४० रु) रुपयांचा धनादेश अंबुजा कंपनीचे विभागीय टेक्निकल मॅनेजर श्री. चंद्रशेखर निधोनकर, टेक्निकल सर्व्हिसेस इंजिनीयर प्रतीक मालपाणी, टेक्निकल इंजिनीयर पवन कोल्हे आणि गोपाल हार्डवेअर जाफराबाद येथील कर्मचाऱ्या समवेत सुपूर्त केला. अंबुजा कंपनी तर्फे सय्यद कुटुंबाला केलेल्या या मदतीचे

सर्वच स्तरातून कौतुक होत असून सय्यद कुटुंबाने अंबुजा सिमेंट आणि टीमचे आभार मानले.अंबुजा सिमेंट कंपनीच्या वतीने अंबुजा रिवार्ड कनेक्ट ही योजना राबविली जाते यात जे कॉन्ट्रॅक्टर बांधव असतील त्या सगळ्यांचा अंबुजा सिमेंट कंपनीच्या माध्यमातून विमा काढला जातो. तसेच सय्यद अहमद नूर यांचाही विमा कंपनीकडुण काढण्यात आला होता. त्यांच्या पाश्चात आपघात विम्याचा लाभ त्यांना आपण अंबुजा सिमेंट कंपनी मार्फत दिला आहे. तसेच सर्वच कॉन्ट्रॅक्टर बंधूनी अंबुजा सिमेंट कंपनीच्या या अंबुजा रिवार्ड कनेक्ट या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले .

अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हा कार्यकारिणीची बैठक

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जालना जिल्ह्याच्या ार्यकारिणीची बैठक दिनांक २६ मे रोजी दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृह अंबड चौफुली जालना येथे आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक अखिल भारतीय ग्राहक पंचायत, देवगिरी प्रांताचे अध्यक्ष मा. डॉ. विलास मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, ही एक महत्त्वपूर्ण सत्र ठरणार आहे. या बैठकीस तालुका व जिल्हास्तरावरील सर्व पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष बालाप्रसाद जेथलिया यांनी केले आहे.

बैठकीत संघटनेच्या पुढील कार्ययोजनांवर चर्चा करण्यात येणार असून, जनहितासाठी प्रभावी निर्णय घेतले जाण्याची अपेक्षा आहे. सर्व संबंधितांनी वेळेत उपस्थित राहून बैठकीस यशस्वी करावे, असे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायत जालनाचे जिल्हाध्यक्ष बालाप्रसाद जेथलिया यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर श्री-शताब्दी जयंतीनिमित्त परतूर येथे कर्तबगार महिला सन्मान सोहळ्या चे आयोजन
विविध विभागाच्या आढावा बैठकीत आ . लोणीकर यांची माहिती

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

परतुर तहसील कार्यालयात आयोजित विविध विभागाच्या आढावा बैठकीत आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती दि. २३ मे २०२५: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्री-शताब्दी जयंतीनिमित्त परतूर येथे एका प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक गावातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दोन महिलांचा सन्मान प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ देऊन केला जाणार आहे. हा उपक्रम अहिल्यादेवींच्या 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' या आदर्शांना साजेसा असून, महिलांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी राबवला जाणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. ते तहसील कार्यालय परतुर येथील सभागृहात वाळूधोरण व विविध विभागाच्या आढावा बैठकीत प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

पुढे बोलताना माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की पुरस्कारासाठी महिलांची निवड पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने केली जाईल. यासाठी स्थानिक समिती स्थापन करण्यात येणार असून, निकषांमध्ये किमान ५-७ वर्षांचे सातत्यपूर्ण कार्य, समाजावर झालेला सकारात्मक प्रभाव आणि प्रेरणादायी नेतृत्व यांचा समावेश असेल. अर्ज प्रक्रिया सुलभ ठेवण्यात येईल, जेणेकरून ग्रामीण भागातील महिलाही सहभागी होऊ शकतील. अर्ज करण्यासाठी गावातील ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि शाळा-महाविद्यालयांमार्फत माहिती प्रसारित केली जाईल. पुढे आमदार बबनराव लोणीकर यांनी हे ही नमूद केले की सन्मान सोहळ्याच्या निमित्ताने अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित प्रदर्शन, व्याख्यानमाला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. यामध्ये स्थानिक कलाकारांचा सहभाग, नाट्य, लोकनृत्य आणि गायन यांचा समावेश

असेल. या कार्यक्रमांमुळे उपस्थितांना अहिल्यादेवींच्या प्रशासकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानाची प्रेरणा मिळेल. हा उपक्रम अहिल्यादेवींच्या कार्याचा वारसा पुढे नेणारा असून, महिलांच्या नेतृत्वाला आणि सक्षमीकरणाला चालना देणारा ठरेल. स्थानिक समुदाय, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्थांच्या सहभागाने हा उपक्रम यशस्वी होईल. सर्वांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आणि कर्तबगार महिलांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना शहरात खुले आम मटका जुगार अड्डयाला खतपाणी घालते कोण ?

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

शहरात खुलेआम मटका, जुगाराचे, मद्यविक्रीचे अड्डे चालवले जात असल्याचे सामजिक कार्यकर्त्या ॲड. रीमा खरात यांनी स्टिंग ऑपरेशन करून उघडकीस आणले. याशिवाय याविरोधात काँग्रेसच्या असंघटित कामगार व कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सूरू आहे. धक्कादायक बाब म्हणजे मटक्याचे अड्डे सूरू ठेवण्यासाठी एका फौजदाराला २५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे. एकीकडे दरोडे, चोरी, लुटमार, खून यासारख्या गुन्हेगारी घटना वाढल्या आहेत. तर दुसरीकडे अशा घटनांना खतपाणी घालणारे जुगार, मटक्याचे अड्डे खुलेआम थाटले आहे. जालना शहरात व जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिस प्रशासन माञ बघ्याची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. जालना जिल्ह्यासह शहरात बहुतेक सर्व प्रकारचे अवैध धंदे सर्रास सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. शहरात मटक्याचे अड्डे सूरू असल्याचे ॲड. रीमा खरात यांनी मंगळबाजार परिसरात काही अड्ड्यावर स्टिंग ऑपरेशन करीत उघडकीस आणले. याशिवाय जुगाराचे अड्डे देखील चालवले जातात. जिल्ह्यातील बहुतांश पोलिस ठाण्यांच्या हद्दीत पत्यांचे, जुगाराचे अड्डे खुलेआम, एखाद्या घरात, हॉटेलवर किंवा मोकळ्या जागेवर एखाद्या शेतात थाटलेली दिसत आहे. त्याबाबत अनेक ठिकाणचे व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल झाले आहेत. अवैध धंदे बंद करण्यासाठी असंघटित कामगार संघटनेचे शेख शमशोद्दीन, सुभाष कांबळे, सय्यद अनिस यांनी बुधवारपासून साखळी उपोषण सूरू केले आहे.

संक्षिप्त

उद्धव खरात एमपिएससी परीक्षेत उतिर्ण

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील मौजे मापेगाव येथील विद्यार्थी उद्धव मदनराव खरात यांची एमपीएससी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल समस्थ गावकऱ्यांचा वतिने जल्लोशात उद्धव खरात यांचे स्वागत करण्यात आले . मापेगाव येथील गरीब कुटुंबातील विद्यार्थी उद्धव मदनराव खरात यांची एमपीएससी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल गावकऱ्याच्या वतीने सत्कार करण्यात आला उपस्थित यावेळी राष्ट्रवादी काग्रेस पक्षाचे पदाधिकारी शाकेर मापेगांकर,रमेश बिजुले,रामप्रसाद काळे,जावेद सर,अंकुश बिजुले, सं रफिक,प्रकाश बिजुले,मदनराव खरात,विलास कातारे,बबण बिजुले,अशोकराव प्रधान,बंडु बिजुले, सर्व गांवकरी मंडळी उपस्थित होते .

अवैध वाळू वाहतुकीच्या टिप्परवर कार्यवाही ; जो टिप्पर पकडला त्याचा चेचेस नंबर बदलण्याची शहरात जोरदार चर्चा !

तभा वृत्तसेवा
मंठा /प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या एका टिप्परला मंठा तहसीलदार यांच्या पथकाने पकडले व सदर टिप्पर हा मंठा येथील अन्नधान्य गोदामामध्ये जमा करण्यात आला. विशेष म्हणजे या टिप्परवर या पूर्वी देखील कार्यवाही झालेली असून दुसऱ्यांदा त्या टिप्परवर महसुल पथकाकडुण कार्यवाही झालेली आहे. असे आसताना त्या टिप्परचा चेचेस नंबा बदलण्यात आला आसल्याची चर्चा मंठा शहरात जोरदारपणे सुरू होतो मात्र तहसीलदार या प्रकरणात काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे , एकाच टिप्परवर दोनदा कारवाई झाल्यास वाहन जप्तीची कारवाई होते. म्हणून त्यातून पळवाट शोधून महसूल विभागाला मॅनेज करून वाहन नंबर किंवा चेचेस नंबर आदला बदली किंवा खाडा तोड करण्याचा प्रयत्न केलेला असावा. अशी देखील चर्चा शहरामध्ये होताना दिसून येत आहे. या अशा प्रकारामुळे तालुक्यातील महसूल प्रशासनामुळे प्रशासनाची प्रतिमा अत्यंत मलिन होत आहे.या गंभीर बाबीकडे जिल्हा अधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी सामान्य नागरिकांत जोर धरत आहे.

महामार्गावर डिझेल चोरणाऱ्या टोळीचा गोंदी पोलिसांकडून पर्दाफाश

तभा वृत्तसेवा
अंबड / प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील दि २५ मे रोजी रात्री ०२.३० वाजेच्या सुमारास वडीगोद्री शिवारातिल NH52 महमार्ग जवळील हॉटेल चौधरी च्या समोर मोकळ्या जागेत तिन्ही आरोपी हे डिझेल चोरी करण्याचा इराद्याने फिरत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना गुप्त बातमीदार मार्फत मिळाली. बातमीची खात्री केली असता इसम नामे १) अजय गुलाब पवार २) संकेत जाधव ३) दत्ता शामगीर नरुके सर्व रा अंबड हे आरोपी राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील वाहतुकीदरम्यान धाब्यावर उभ्या राहणाऱ्या ट्रक मध्ये डिझेल चोरी करण्यासाठी आलेले होते. तिन्ही आरोपी हे वडीगोद्री परिसरात आलेले असताना एस एस चौधरी ढाब्यासमोर उभ्या असलेल्या ट्रकमधील डिझेलची चोरी करत असतांना चाहूल लागल्याने ते पळून जात असताना त्यातील एकाने चाकू मारण्याचा प्रयत्न करून धाक निर्माण केला. त्या तीन पैकी आरोपी अजय गुलाब पवार यास अटक करून याच्या ताब्यातून दोन मोटरसायकल, एक चाकू, दोन ३५ लिटरच्या प्लास्टिक कॅन असा एकूण १,५०,५०० (एक लाख पन्नास हजार पाचशे रुपये) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध दोन पोलिस पथकामार्फत सुरू आहे. सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक, श्री अजयकुमार बंसल साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. आयूष नोपाणी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, श्री विशाल खांबे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. आशिष खांडेकर, कढ रामदास केंद्रे, झउ प्रदिप हवाले, शाकिरोद्दीन सिध्दीकी, चालक एस बी साठे सर्व पोलीस ठाणे गोंदी यांनी केली.

पाडेवार यांच्या प्रयत्नातून इंदिरानगराचा पाणीपुरवठा झाला सुरळीत !

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

परतुर शहरातील इंदिरानगर भागात मागील अकरा दिवसांपासून नळाला पाणी येत नव्हते. पाण्याअभावी नागरिकांचे प्रचंड हाल होत होते. काही नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांना ही समस्या सांगितली. पाडेवार यांनी तात्काळ दखल घेत परतुर नगरपालिकेचे पाणीपुरवठा अधिकारी देशपांडे यांच्याशी संपर्क साधला. आणि तात्काळ पाणीपुरवठा सुरु झाला. नळाला पाणी आल्याने विशेषत: महिला वर्गाला मोठा आनंद झाला. इंदिरानगर वासियांनी पाडेवार यांना धन्यवाद दिले.

पाडेवार यांनी शहरातील विविध भागातील समस्या प्राधान्याने पुढाकार घेऊन सोडवल्या आहेत. शहरात पाणी, वीज, आरोग्य, रस्ते इतर कुठलीही असो नागरिक पाडेवार यांना हक्काने कामे सांगतात. आणि पाडेवार देखील सर्व समस्या प्राधान्याने सोडवितात. सर्व प्रकारच्या समस्यावरचा उपाय म्हणजे अर्जुन पाडेवार असे समीकरणच आता तयार झाले आहे.